महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले अधिवेशन, २०१८

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ / फाल्गुन ९, १९३९ (शके)

(१) मुख्यमंत्री
(२) गृहनिर्माण मंत्री
(३) कामगार, भूकंप पुनर्वसन, कौशल्य विकास, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री

} **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ६८

भीमा-कोरेगाव (ता.शिरुर, जि.पुणे) येथे घडलेल्या दंगलीबाबत

(१) * ३७७८२ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, ॲड.अनिल परब, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमा-कोरेगाव (ता.शिरुर, जि.पुणे) येथील विजयस्तंभाला दोनशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी मोठया प्रमाणात आलेल्या जनसमुदायावर दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास काही समाजकंटकानी आक्रमक होऊन दगडफेक केल्यामुळे प्रचंड प्रमाणात दंगल उसळली व त्यात एका व्यक्तीचा मृत्यू व अनेक व्यक्ती जखमी झाल्या तसेच या घटनेचे राज्यभर तीव्र पडसाद उमटून या घटनेच्या निषेधार्थ दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास राज्यात बंद पाळण्यात आला असून उक्त प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी काही दलित संघटना व राजकीय पक्षांनी जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भीमा-कोरेगाव परिसरात कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहचू नये यासाठी दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी बंद ठेवण्याबाबत येथील ग्रामस्थांनी निर्णय घेवून तसे पोलिसांना दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी कळविले असूनही पोलिसांनी सुरक्षेसाठी पुरेशा उपाययोजना केल्या नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) प्रकरणी दंगल घडविण्यासाठी, भडकवण्यासाठी कृती करणाऱ्या शिवसागर प्रतिष्ठानचे संभाजी भिडे आणि हिंदु जनजागरण समितीचे मिलिंद एकबोटे यांच्यावर शासनाने गुन्हा नोंद करुनही अद्याप अटक करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, "महाराष्ट्र बंद" मध्ये झालेल्या हिंसाचार, जाळपोळ, लुटालुट, दगडफेक इत्यादीमुळे शासकीय, निमशासकीय संस्थांचे व खाजगी व्यक्तींचे झालेले नुकसान बंद पुकारणाऱ्या व्यक्तींकडून/संस्थांकडून वसूल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बाबत शासनाने चौकशी करुन दोषी आढळून आलेल्यांवर कारवाई करण्याबाबत व उक्त घटनेत मृत व जखमी झालेल्यांना आर्थिक मदत देण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय हे खरे आहे.

(२) ग्रामपंचायत भिमा-कोरेगांव, ता.शिरुर, जि.पुणे व ग्रामस्थ यांनी दिनांक ०१/०१/२०१८ रोजी भिमा-कोरेगांव बंद ठेवण्याबाबत निर्णय घेतला असल्याचे पत्र शिक्रापूर पोलीस स्टेशनला प्राप्त झाले होते. एकूण परिस्थिती पहाता, सुरक्षेच्या दृष्टीकोनातून मागील वर्षापेक्षा सुमारे चार पट अधिक पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला होता. त्याशिवाय दोन एसआरपीएफ कंपन्या, २ दंगल नियंत्रण पथके, १ स्ट्रायकिंग पथक असा अधिक पोलीस बंदोबस्तही नेमलेला होता.

(३) मिलिंद एकबोटे यांना मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २०/०२/२०१८ रोजी पर्यंत सी.आर.नं. ०९/२०१८ मध्ये पोलीस स्टेशन शिक्रापूर येथे अटक केल्यास त्यांना रुपये १,००,०००/- च्या बंधपत्रावर सोडण्यात यावे असे दिनांक ०७/०२/२०१८ रोजी आदेश दिले आहेत. संभाजी भिडे यांच्याविरुध्द अधिक तपास सुरु आहे.

(४) याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

(५) सदर घटनेच्या अनुषंगाने विविध पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल आहेत. यापैकी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गु.र.नं. ०२/२०१८ भादंवि कलम ३०२, १४३, १४७, १४८, १४९ सह मु.पो.अधि.१९५१ चे कलम ३७(१), १३५ मधील मयत इसमाच्या नातेवाईकांना शासनाच्यावतीने दहा लाख रुपयाची आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील लोअर परळ येथील कमला मिलमध्ये लागलेल्या आगीच्या दुर्घटनेबाबत

(२) * ३८०६२ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.हरिसिंग राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर,

श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयंत पाटील, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रविंद्र फाटक, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लोअर परळ येथील सेनापती बापट मार्गावरील कमला मिल मधील 'वन अबव्ह' आणि 'मोजोस ब्रिस्टो' या पबने अवैध बांधकाम करुन अग्निसुरक्षेचे उल्लंघन व अवैध पार्कींग केल्यामुळे भीषण आग लागून १४ जणांचा मृत्यू व १२ जण जखमी झाल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमला मिल कंपाऊंडमध्ये अनधिकृत बांधकाम केले आहे, अशी तक्रार दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास श्री.मंगेश प. कसालकर यांनी जी/दक्षिण विभाग बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांचा जमिनीवर पब, हॉटेल, मॉल, कॅफे आदीचे बांधकाम करताना विकास नियंत्रण नियमावलीचे मोठया प्रमाणावर उल्लंघन झाले असून याकडे शासनाचे व महानगरपालिकेचे दुर्लक्ष झाले असल्यामुळे कमला मिल दुर्घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राथमिक चौकशीत सदरील आग हुक्क्यास लागणाऱ्या कोळसाच्या ठिणगीमुळे लागली असल्याचे निदर्शनास आले असून मुंबई, ठाणे, पुणे तसेच विदर्भात नागपूर, चंद्रपूर या शहरात मोठया प्रमाणात हुक्का पार्लर रेस्टॉरेंट, पब सुरु असून उक्त रेस्टॉरेंट व पब मध्ये देखील अग्निसुरक्षेचे उल्लंघन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) लोअर परळ येथील कमला मिल कंपाऊंडमधील 'वन अबव्ह' आणि 'मोजोस ब्रिस्टो' या दोन रेस्टोपबमध्ये दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी लागलेल्या भीषण आगीत १४ जणांचा मृत्यू झाला असून, ५४ जण जखमी झाले आहेत व अग्निशमन दलाचा १ जवान जखमी झाला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) अशा आशयाची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/दक्षिण विभागाकडे करण्यात आली होती हे खरे आहे.

(३) मुंबईतील बंद पडलेल्या कापड गिरण्यांच्या विकासाला विकास नियंत्रण नियमावलीच्या सुधारीत कलम ५८ अन्वये बांधकाम परवानग्या देण्यात आल्या आहेत.

सदर सुधारीत कलमानुसार कापड गिरण्यांच्या जमिनीवर वाणिज्यिक/व्यावसायिक वापर अनुज्ञेय आहे.

तथापि, बांधकाम परवानगी देण्यात आल्यानंतर आढळून आलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने सदर आगीच्या दुर्घटनेची चौकशी केली असता, सदर आग "आगीचे उडते निखारे जळाऊ कापडाशी संपर्कात आल्यामुळे" व सदर आगीची सुरुवात ही "मोजोस बिस्ट्रो" रेस्टॉरंटमध्ये झाली असल्याचे निष्पन्न झाले.

ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील रेस्टॉरंट व पबमध्ये अग्निसुरक्षेचे उल्लंघन झाले हे खरे नाही असे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

चंद्रपूर क्षेत्रांतर्गत हुक्का पार्लर रेस्टॉरंट, पब सुरु नाहीत अथवा तशी परवानगी चंद्रपूर महानगरपालिकेकडून देण्यात आलेली नसल्याचे चंद्रपूर महानगरपालिकेने कळविले आहे.

पुणे व नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील काही आस्थापनांनी अग्निसुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे.

(५) व (६) सदर दुर्घटनेनंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने बेकायदा हॉटेल्स, रेस्टॉरंट व पबवर कारवाई करुन ४४० बेकायदा बांधकामे जमीनदोस्त केली आहेत.

सदर दुर्घटनेशी संबंधित मुंबई अग्निशमन दलाचे सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले असून, एक केंद्र अधिकारी यांना ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाण्यामार्फत दिनांक २०/०१/२०१८ रोजी अटक झाल्यानंतर निलंबित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २९१/२०१८ कलम ३०४, ३३७, ३३८, २१६, २८५, १९७, १९८, ४७१, ४६६, ४६७, ३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राथमिक चौकशी करुन अहवाल शासनास सादर केला आहे.

सदर चौकशी अहवालामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांत कार्यरत असलेल्या एकूण १२ अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून, खात्यांतर्गत चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

पुणे व नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील अग्निसुरक्षेचे उल्लंघन केलेल्या आस्थापनांवर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण अधिनियम, २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येत आहे.

नंदुरबार नगरपरिषदेच्या पाणीपुरवठाच्या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत

(३) * ३८५०४ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार नगरपरिषदेने महाराष्ट्र राज्य सुवर्ण वर्ष महाअभियानांतर्गत २४x७ चा पाणी पुरवठ्याच्या प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाला मंजूरी देण्यात आली आहे काय व त्याबाबत अंमलबजावणी कधीपासून करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही. नंदुरबार नगरपरिषदेकडून याबाबतचा प्रस्ताव अद्याप शासनाकडे सादर झालेला नाही.

(२) व (३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या स्थायी आदेशानुसार प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेऊन नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करणे आवश्यक आहे.

त्यानुसार ज्या शहरांचा पाणीपुरवठा १३५ लिटर प्रतिमाणशी प्रतिदिन पेक्षा कमी प्रमाणात होत असेल अथवा शहरातील पाणी पुरवठयाची व्याप्ती १००% पुर्ण नसेल अशा शहरांसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात येतात.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने स्वच्छ भारत अभियानाची जनजागृती करण्याचे काम काळ्या यादीतील कंपनीस दिल्याबाबत

(४) * ३७६५२ ॲड.अनिल परब : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने स्वच्छ भारत अभियानाची जनजागृती करण्याकरिता प्रसिध्दीकामासाठी माध्यम अभिकरण नियुक्त करण्याच्या कामाकरिता मे.कौटिल्य मल्टीक्रियेशन प्रा.लि, मुंबई यांची नेमणूक केली असून कामाचा कालावधी दिनांक १ जानेवारी, २०१७ ते दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ असा निर्धारित करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंपनीकडे अन्न निरीक्षक व लिपीकवर्गीय कर्मचाऱ्यांची पात्रता नसतानाही तसेच कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या परिवहन सेवा विभागाने काळया यादीत टाकलेले असतानाही स्वच्छ भारत अभियानाची जनजागृती करण्याच्या महत्वाच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कंपनीने केलेल्या कामांबाबत महानगरपालिकेने अवलंबविलेली मुल्यमापन पध्दती व सदर कामाचे मुल्यमापन करणेकरिता प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती न करणे, बिलांची अदायगी करणेकरिता

काम केल्याचा दाखला प्रमाणित करण्यासाठी वर्ग १ व २ चा जबाबदार अधिकारी नियुक्त न करणे अशा महत्वाच्या नियमाचे उल्लंघन केलेले असतानाही सदर कंपनीला उपरोक्त काम देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषी कंपनीविरुध्द तसेच काळ्या यादीत समाविष्ट असणाऱ्या कंपनीस उपरोक्त काम देणाऱ्या संबंधित अधिकारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत स्वच्छ भारत अभियानाची जनजागृती व प्रचार प्रसिद्धी करीता निविदा प्रक्रिया पार पाडून मे.कौटिल्य मल्टीक्रियेशन प्रा.लि., मुंबई यांची दिनांक ०३/११/२०१७ ते दिनांक ०२/११/२०१८ या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली आहे, हे खरे आहे

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाने मे.कौटिल्य मल्टीक्रियेशन प्रा.लि., मुंबई या कंपनीस काळया यादीत टाकलेले नाही. निविदा प्रक्रियेअंती सदर कंपनीचा देकार न्युनतम असलेने त्यांना स्वच्छ भारत अभियानाची जनजागृती व प्रचार प्रसिद्धी करण्याचे काम देण्यात आलेले आहे. सदर कंपनीकडे पुरेसा कर्मचारी वर्ग आहे, असे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) कंपनीने केलेल्या कामाच्या मुल्यमापनासाठी व काम करणेचा दाखला प्रमाणित करण्यासाठी महानगरपालिकेच्या सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी (वर्ग-२) व उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) (वर्ग-१) यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

औंध (जि.पुणे) भागातील एका तरुणाने ऑनलाईन पध्दतीने श्वान विक्रीच्या अमिषाने फसवणूक केल्याबाबत

(५) * ३७६६१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंध (जि.पुणे) भागातील एका तरुणाने ऑनलाईन पध्दतीने श्वान विक्रीच्या अमिषाने देशभरातील ३० ते ४० जणांची फसवणूक केल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला असून या प्रकरणी एकाला अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आरोपीवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) औंध (जि.पुणे) भागातील एका तरूणाने ऑनलाईन पद्धतीने श्वान विक्रीच्या अमिषाने पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील ४ जणांची फसवणूक केल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आला असून सदर प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे.

(२) उक्त प्रकरणी फिर्यादींच्या तक्रारीवरून पुढीलप्रमाणे ४ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(१) बिबवेवाडी पोलीस स्टेशन :- गुन्हा क्र. ८/२०१८, भादंवि कलम ४१९, ४०, माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६.

(२) कोंढवा पोलीस स्टेशन :- गुन्हा क्र. ७/२०१८ भादंवि कलम ४१९, ४२०, आय.टी. ॲक्ट कलम ६६ (सी).

(३) येरवडा पोलीस स्टेशन :- गुन्हा क्र. १०/२०१८, भादंवि कलम ४१९,४२०, माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६ (डी).

(४) हिंजवडी पोलीस स्टेशन :- गुन्हा क्र. ७/२०१८, भादंवि कलम ४१९,४२०, माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६६.

उपरोक्त नमुद गुन्ह्यापैकी बिबवेवाडी, कोंढवा आणि हिंजवडी पोलीस स्टेशन येथील गुन्हे तपासावर आहेत व येरवडा पोलीस स्टेशन येथील गुन्हयात मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले असून सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई महानगरपालिका संचलित शाळांतील कर्मचारी व शिक्षकांना महानगरपालिकेच्या सोयी व सवलती मिळण्याबाबत

(६) * ३८९६८ श्री.कपिल पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिका संचलित माध्यमिक शाळेतील शिक्षकांना महानगरपालिका प्रशासन शासनाचे कर्मचारी मानत असल्यामुळे त्यांना महानगरपालिकेच्या सोयी व अन्य सवलती मिळत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिका संचलित अनुदानित, विनाअनुदानित आणि मुंबई पब्लिक स्कूल योजनेतील शाळांतील कर्मचारी व शिक्षक मुंबई महानगरपालिकेचे की शासनाचे याबाबत नगरविकास विभागाची काय भूमिका आहे,

(३) तसेच, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संचलित माध्यमिक शाळेतील शिक्षकांना महानगरपालिकेच्या सोयी व अन्य सवलती मिळण्याच्यादृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असणाऱ्या पालिका माध्यमिक शाळांना शालेय शिक्षण विभागाची माध्यमिक शाळा संहिता लागू असून, या संहितेनुसार सदर शाळांना वेतनश्रेणी, अर्हता नियम (शैक्षणिक व व्यावसायिक) आणि अनुदान मान्यतेकरिता माध्यमिक शाळा संहितेप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तथापि, माध्यमिक शाळा संहितेव्यतिरिक्त महानगरपालिका सेवेच्या अन्य शर्ती तसेच महानगरपालिका वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतचा विकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेस देण्यात आला आहे.

परंतु सदरचा विकल्प न स्विकारता केवळ माध्यमिक शाळा संहितेप्रमाणेच देय बाबी देण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे.

महानगरपालिकेच्या उपरोक्त निर्णयामुळे महानगरपालिका माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी जरी महानगरपालिकेचे कर्मचारी असले तरी त्यांना महानगरपालिका सेवा नियमावली, अन्य अटी/ शर्ती व सोयी-सुविधा लागू नाहीत.

कनिष्ठ महाविद्यालयातील व्दिलक्षी अभ्यासक्रम (बायोफोकल) अनुदानित करणेबाबत

(७) * ३९१५१ श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातील कनिष्ठ महाविद्यालयातील कनिष्ठ व्दिलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम (बायोफोकल) सन १९७८-७९ पासून विनाअनुदानित तत्वावर सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अभ्यासक्रम विनाअनुदानित तत्वावर सुरू असल्याने विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणात फी वसूल केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर व्यवसाय अभ्यासक्रमातील शिक्षक व निर्देशकांना अनुदान मिळण्यासाठी शिक्षक संघटनांकडून शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरील अभ्यासक्रम अनुदानित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) सन १९७८-७९ पासून व्दिलक्षी अभ्यासक्रम सुरु आहेत. परंतु सदर अभ्यासक्रमांना विना अनुदान तत्वावर सन १९९७-९८ पासून संस्थांना परवानगी देण्यात आली आहे.

(२) मोठ्या प्रमाणात फी वसुल केली जात असल्याबाबत विद्यार्थी अथवा कोणत्याही संघटनेची निवेदने प्राप्त झालेली नाहीत.

(३) अनुदान मिळण्याकरिता शिक्षक व निदेशक संघटनाकडून कोणतीही निवेदने प्राप्त झालेली नाहीत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात प्रमुख शहरांमधील समृध्दी महामार्ग, मेट्रो, ट्रान्सहार्बर लिंक आणि कोस्टल रोड यासारख्या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत

(८) * ३८४४८ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनावर साडेचार लाख कोटी रुपयांचे कर्ज असून मुंबई, ठाणे, पुणे, नागपूरसह प्रमुख शहरात १ लाख ४२ हजार ३०६ कोटी रुपयांची कामे सुरु असून आणखी काही प्रकल्प प्रस्तावित आहेत, सदर कामे पूर्ण करण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने याकरिता शासनाने कोणकोणत्या संस्थाकडून किती रुपयांचे कर्ज घेतले आहे, तसेच जपान शासनाकडून दीड लाख कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात येणार असून याबाबत सामंजस्य करार माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या आठवडयात झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे आणि नागपूर या प्रमुख शहरांमधील समृध्दी महामार्ग, मेट्रो, ट्रान्सहार्बर लिंक आणि कोस्टल रोड यासारख्या प्रकल्पासाठी सुमारे ३५० लाख कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाच्या ७ लाख ११ हजार कोटी रुपयांच्या व्याजाचा भरणा करण्यासाठी शासनाकडे पैसे नसल्याने ३५० कोटी रुपयांचा ओव्हर ड्राफ्ट काढावा लागल्याचा माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकल्पांसाठी जपान शासन बरोबर करण्यात आलेल्या सामंजस्य कराराचे स्वरुप काय आहे व कोणत्या अटींवर किती कर्ज मिळालेले आहे अथवा मिळण्याचे अपेक्षित आहे व त्याची परतफेड कशाप्रकारे करण्यात येणार आहे, तसेच उक्त रकमेचा विनियोग कशाप्रकारे करण्यात येणार आहे,

(५) तसेच राज्याची आर्थिक स्थिती सक्षम रहावी यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत व त्याची फलनिष्पत्ती काय आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासनावर कर्ज असताना व जीएसटीमुळे राज्याच्या महसूलात घट झाली असतांना समृध्दी महामार्ग, मेट्रो, ट्रान्सहार्बर लिंक आणि कोस्टल रोड प्रकल्पाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारण काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) राज्यात मेट्रो, मुंबईतील कोस्टल रोड, समृध्दी महामार्ग, मुंबई पारबंदर प्रकल्प, यासारखे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

(३) नाही.

(४), (५) व (६) मुंबई मेट्रो लाईन-३, नागपूर मेट्रो, पुणे मेट्रो हे प्रकल्प केंद्र व राज्य शासनाचा संयुक्त सहभाग असलेल्या कंपनीमार्फत राबविण्यात येत आहेत. या प्रकल्पांसाठी केंद्रशासनाने कर्ज सहाय्य घेतले आहे. यापैकी मुंबई मेट्रो लाईन-३ करीता केंद्रशासनाने जायकाचे कर्ज घेतले असून सदर कर्ज ३० वर्षात परतफेड करावयाचे आहे. याकरीता व्याजाचा दर १.४% आहे. मुंबई पारबंदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत असून सदर प्रकल्पासाठी रुपये १५१०० कोटीचे जायकाचे कर्ज मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत घेण्यात येत आहे. समृध्दी महामार्ग हा प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत राबविण्यात येत

आहे. सदर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी राज्यातील एमएमआरडीए, सिडको, म्हाडा, एसआरए व एमआयडीसी यासारख्या संस्थांकडून कर्ज स्वरुपात अर्थसहाय्य करण्यात येत आहे. मुंबईतील कोस्टल रोड हा प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येत आहे. मुंबईतील मेट्रो प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत निधी तसेच कर्ज सहाय्याची उभारणी करण्यात येत आहे. यापैकी मुंबई मेट्रो लाईन-४ प्रकल्पासाठी एआयआयबीकडून एमएमआरडीए कर्ज घेणार असून मुंबई मेट्रो लाईन २ब व ७ साठी अशियन बँकेचे कर्ज सहाय्य घेण्यात येत आहे. सदर कर्ज सहाय्याची संपूर्ण जबाबदारी एमएमआरडीएची आहे. अशारितीने प्रश्नाधीन प्रकल्प विविध संस्थां/प्राधिकरणे यांच्याकडील निधी व कर्जाची त्यांची जबाबदारी यावर राबविण्यात येत असून राज्याच्या अर्थसंकल्पावर अतिरिक्त ताण येणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे.

चंद्रभागा नदी प्रदुषण मुक्त करण्याबाबत

(९) * ३७६९३ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.रामहरी रुपनवर, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक २५५८४ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री क्षेत्र पंढरपूर येथील चंद्रभागा नदीच्या स्वच्छतेसाठी शासनाने नमामी चंद्रभागा ही योजना आखली असून त्यासाठी २० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रभागा नदीच्या तिरावर असलेल्या मठातील व पंढरपूर शहरातील सांडपाणी व प्लास्टिक नदी पात्रात टाकले जात असल्याचे स्थानिक नागरिक व वृत्तपत्रे यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले असून सांडपाणी व प्लास्टिक नदीपात्रात टाकण्यात येऊ नये यासाठी प्रशासनास निवेदनही देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चंद्रभागा नदीत सोडले जाणारे शहरातील सांडपाणी बंद करून व प्लास्टिकच्या कचऱ्याची गंभीर समस्या दुर करुन चंद्रभागा नदीचे पावित्र्य अबाधित राखण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

तथापि, सुधारित अंदाजपत्रकानुसार रुपये १६.८० कोटी एवढी रक्कम पर्यावरण विभागाकडून विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयास उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(२) होय.

(३) अशा आशयाच्या तक्रारी प्राप्त होताच त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात येते.

केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत पंढरपूर शहरामध्ये १५.५० एम.एल.डी क्षमतेचा मल:निस्सारण प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. सदर मल:निस्सारण प्रकल्पातून सध्या प्रतिदिन ८ एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रीया करण्यात येत आहे.

या व्यतिरिक्त पंढरपूर शहराची भविष्यातील गरज विचारात घेऊन ५ एमएलडी मलप्रक्रीया क्षमता निर्माण करण्याच्या अनुषंगाने रुपये ५९.७५ कोटीच्या प्रकल्पास शासनाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत दिनांक ०७/०२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी दिली असून याबाबतची ई-निविदा काढण्यात आली आहे.

शहरातील ओल्या व सुक्या कचऱ्याचे ९०% पर्यंत विलिगीकरण करण्यात येत असून त्याद्वारे प्लास्टिक हे पुनर्वापरासाठी विक्रेत्याकडे पाठविले जाते. स्वच्छ भारत अभियानांतर्गत पंढरपूर शहरासाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून रुपये ९.४२ कोटीच्या योजनेस शासनाने मंजूरी दिली आहे. याबाबतची ई-निविदा काढण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामाबाबत

(१०) * ३८०१८ श्री.जगन्नाथ शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात जे.एन.एन.आर.यु.एम योजनेमधून मोठ्या प्रमाणात रस्त्यांचे सिमेंटीकरण झालेले असणे, खड्डे बुजवण्याचा कामासाठी रुपये १२ कोटी खर्च करण्यात आले असतानाही माहे डिसेंबर, २०१७ अखेरीस झालेल्या स्थायी समितीच्या सभेत १४.५० कोटी रुपये विविध सेवा पुरवणाऱ्या संस्थांनी खोदलेले रस्ते पूर्ववत करण्यासाठी मंजूर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रस्ते तयार करतानाच त्यामध्ये या वाहिन्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था केली असती तर हा खर्च कमी झाला असता असे मत स्थायी समिती सभापतीसह इतर सदस्यांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांच्या कामातील नियोजनांच्या अभावामुळे करदात्या नागरिकांचा पैसा नाहक खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित रस्त्याचे यापूर्वी काम करताना सेवा वाहिन्यांसाठी व्यवस्था करण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्याऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१)

- कल्याण-डोंबिवली शहरामध्ये एकूण ५१७ कि.मी. लांबीचे रस्ते आहेत.
- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ३२ कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या काँकिटीकरण प्रकल्पास शासनाने मान्यता दिली असून सदर योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.

- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत प्रगतीपथावर असलेली काँकिटीकरणाची कामे वगळता शहरातील उर्वरीत रस्त्यांच्या पावसाळयापूर्वी, पावसाळयात तसेच नंतर देखभालीसाठी रुपये ११.६३ कोटी किंमतीची कामे महानगरपालिका निधीमधून प्रगतीपथावर आहेत.
- महानगरपालिका क्षेत्रात विविध सेवा पुरविणाऱ्या संस्थांना सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदलेले रस्ते पुर्ववत करण्याच्या रुपये १४.५० कोटीच्या कामास कल्याण डोंबिवली महानगरपालिका स्थायी समितीने माहे डिसेंबर, २०१७ मध्ये मान्यता दिली आहे.

(२), (३), (४) व (५)

- महानगरपालिका क्षेत्रातील अस्तित्वातील रस्त्यांमध्ये सेवावाहिन्या टाकण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था नसल्याचा अहवाल महानगरपालिकेने सादर केला आहे.
- कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध सेवा पुरविणाऱ्या संस्थांना सेवावाहिन्या टाकण्यासाठी खोदलेले रस्ते पूर्ववत करण्याच्या रुपये १४.५० कोटी किंमतीच्या प्रस्तावास कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या स्थायी समितीनेच मान्यता दिली आहे.
- त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध सेवा पुरविणाऱ्या संस्थांना सेवावाहिन्या टाकणेकामे, सदर संस्थांकडून खोदलेले रस्ते पूर्ववत करणेसाठी संबंधित संस्थेकडून शुल्क आकारण्यात येत असते. त्यासाठी महानगरपालिका निधीतून अतिरिक्त खर्च करण्यात येत नाही.

ऐरोली (नवी मुंबई) येथे सुरु असलेल्या नाट्यगृहाच्या बांधकामाच्या खड्डयात एका महिलेने छोट्या मुलासह आत्महत्या केल्याबाबत

(११) * ३८०९२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऐरोली, नवी मुंबई येथे सुरु असलेल्या नाट्यगृहाच्या बांधकामाच्या २० फूट खोल खड्डयात एका महिलेने छोट्या मुलासह आत्महत्या केल्याची घटना माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नाट्यगृहाचे काम बेजबाबदारपणे हाताळणाऱ्या ठेकेदार व संबंधित महानगरपालिका अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी रबाळे पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यू क्र.०३/१८ सीआरपीसी १७४ प्रमाणे दिनांक ०२/०१/२०१८ रोजी दाखल करण्यात आला असून त्याबाबतचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेची जमीन खाजगी संस्थेस दिल्याबाबत

(१२) * ३८७३८ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेच्या दिनांक २० जुलै, २०१७ च्या सर्वसाधारण सभेत ऐनवेळच्या विषयात ठराव घेऊन एन-९ सिडको येथील साडेचार एकर जागा अत्रिणी बहुउद्देशीय या खाजगी संस्थेस दिल्याचा ठराव मंजूर करण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी संस्थेस भाडे तत्वावर जागा देण्याकरीता नियमांचे उल्लंघन करुन करोडो रुपयांची जागा खाजगी संस्थेस दिल्याने महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २० जुलै, २०१७ च्या बैठकीतील ऐनवेळचे विषय जनहितार्थ विखंडीत करण्यासाठी विभागीय आयुक्त यांचेमार्फत शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर ठराव विखंडीत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) औरंगाबाद महानगरपालिकेच्या दिनांक २०/०७/२०१७ रोजीच्या सर्वसाधारण सभेमध्ये एन-९ सिडको येथील शाळेची इमारत अत्रिणी बहुउद्देशीय शैक्षणिक संस्था, औरंगाबाद यांना भाडेतत्वावर देण्याबाबत सन्माननीय सदस्यांकडून अशासकीय प्रस्ताव ठेवण्यात आला.

त्याबाबत सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे भाडे आकारणी करुन एन-९ सिडको येथील शालेय इमारत अत्रिणी बहुउद्देशीय शैक्षणिक संस्थेस देण्याबाबत अशासकीय ठराव महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने मंजूर केलेला आहे.

तथापि, सदर ठरावास प्रशासकीय मान्यता दिलेली नसल्यामुळे ठरावाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी (जि.ठाणे) येथील अनधिकृत गोदामांवर कारवाई करण्याबाबत

(१३) * ३८१०८ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील अनधिकृत गोदामांची (वेअर हाऊस) पहाणी करुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत सहाय्यक पोलीस आयुक्त, पूर्व विभाग, भिवंडी यांनी सहायक नियंत्रण, अनधिकृत बांधकाम, भूमी व मिळकत शाखा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, उप प्रादेशिक कार्यालय, टिळक चौक, कल्याण (पश्चिम) यांना दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलीस स्टेशन यांना पेट्रोलिंगचे दरम्यान गोदामामध्ये ठेवण्यात येणाऱ्या साठ्याकरिता लागणाऱ्या आवश्यक परवान्यांची तपासणी करुन योग्य ती कारवाई करण्याबाबतचे पत्रही सहाय्यक पोलीस आयुक्तांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सहायक नियंत्रण, अनधिकृत बांधकाम, भूमी व मिळकत शाखा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, उप प्रादेशिक कार्यालय, कल्याण यांनी तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नारपोली पोलीस स्टेशन यांनी आजतागायत किती गोदामांवर कारवाई केली, तसेच कारवाई केली नसल्यास, कर्तव्यात कामचुकारपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे तात्काळ निलंबन करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत परिमंडळ - २ च्या नारपोली पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये एकुण १८ गावे आहे. या ठिकाणी गोडावून परिसरामध्ये बीट अधिकारी व बीट मार्शल कर्मचारी यांना बेकायदेशीर ज्वलनशील पदार्थाची साठवणूक करणारे गोडाऊनची माहिती प्राप्त करुन कारवाई करणेबाबत व जॉइन्ट चिफ कंट्रोलर, एक्सप्लोसीव्ह, नवी मुंबई यांना सर्वेक्षण होऊन कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. पोलीस विभागाकडून खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे.

अ.क्र.	सन	एकुण टाकण्यात आलेल्या धाडी	अटक आरोपी
१	२०१३	०५	०९
२	२०१४	३०	०७
३	२०१५	०४	१९
४	२०१६	०१	०१
५	२०१७	०२	१४

त्याचप्रमाणे या प्रकरणी सहायक नियंत्रण, अनधिकृत बांधकाम, भूमी व मिळकत शाखा, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, उप प्रादेशिक कार्यालय, ठाणे यांनी १४८ प्रकरणांमध्ये संबंधित विकासक, जमीन मालक व भोगवटादार यांना नोटीस बजाविल्या आहेत. ५२ प्रकरणांच्या निष्कासनाची कार्यवाही चालू आहे. १० प्रकरणात गुन्हे दाखल आहेत. २ प्रकरणांमध्ये अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लोहगाव (ता.हवेली, जि.पुणे) येथील राखपसरे येथे हातभट्टी दारुचा धंदा चालत असल्याबाबत

(१४) * ३९०४८ श्री.रामराव वडकुते : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहगाव (ता.हवेली, जि.पुणे) येथील राखपसरे येथे हातभट्टी दारुचा धंदा तुकाराम विद्यालय व मंदिराजवळ चालत असल्याबाबत ग्रामपंचायत लोहगाव यांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनी जिल्हा पोलीस अधिक्षक, पुणे यांच्याकडे गेल्या २ वर्षांपासून तसेच दिनांक ९ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी तक्रारी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी पोलिसांनी अद्याप कोणतीच कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अवैध धंद्यांना आळा घालण्याकरिता शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

ग्रामपंचायत, लोहगाव, पुणे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने राखपसरे वस्ती व लोहगाव परिसरात अवैध धंद्यावर छापे घालून एकूण २१ केसेस करण्यात आल्या असून त्यामध्ये २३ आरोपींना अटक करून त्यांचेकडून १५३.३९ लीटर गावठी, हातभट्टी व विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे. सदर जप्त केलेल्या मालाची किंमत रूपये ७७,६६३/- आहे.

राखपसरे वस्ती व लोहगाव परिसरात पोलिसांचा २४ तास फिक्स पॉईंट लावून बंदोबस्त लावण्यात आलेला असून सदर परिसरात अवैध धंदे चालू असल्याचे आढळून आल्यास कारवाई करण्यात येत आहे तसेच गृह विभाग शासन परिपत्रक दिनांक १ मार्च, २०१७ अन्वये अवैध दारू विक्री, निर्मिती व इतर संलग्न बाबीसंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत सर्व पोलीस घटकांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील मोठे व्यावसायिक, सेलेब्रिटी व इतर महत्त्वाच्या व्यक्तींना देण्यात आलेल्या पोलीस संरक्षणाच्या खर्चाची वसूली करण्याबाबत

(१५) * ३७७९६ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठे व्यावसायिक, सेलेब्रिटी व इतर महत्त्वाच्या व्यक्तींना शासनाकडून पोलीस संरक्षण देण्यात येते मात्र गेली कित्येक वर्षे त्यांच्याकडून संरक्षण खर्चाची वसूली करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्यांना १०-१५ वर्षापूर्वी पोलीस संरक्षण देण्यात आले होते अशा व्यक्तीच्या जीवाला अद्यापही धोका आहे किंवा नाही याचा आढावा शासनाकडून घेण्यात आला नसल्याची बाब ही निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिवाला धोका असणाऱ्यांना देण्यात येणाऱ्या पोलीस संरक्षणाबाबत नव्या मार्गदर्शक सूचना गृह विभागाने तयार केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रतिष्ठित व्यक्तींना देण्यात येणाऱ्या संरक्षणाबाबत नवीन धोरणांची तात्काळ अंमलबजावणी करुन प्रतिष्ठित व्यक्तींकडून संरक्षण खर्च वसूल करुन पोलीस संरक्षण काढून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) काही व्यक्तींनी पोलीस संरक्षण शुल्क भरलेले नाही हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) नवीन मार्गदर्शक सूचनेची अंमलबजावणी करुन थकीत संरक्षण शुल्काची रक्कम वसूल करण्याची कार्यवाही महाराष्ट्र जमीन महसूल (जमीन महसूल वसूली) कायदा, १९६७ मधील तरतूदीनुसार जिल्हाधिकारी मार्फत सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

माढा (जि.सोलापूर) येथील नगरपंचायतीतील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(१६) * ३८२४१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा (जि.सोलापूर) येथील नगरपंचायतीत अपुरे अधिकारी व कर्मचारी असल्याने शहराच्या विकासाला खिळ बसत असल्याने नागरिकांच्या कामांना विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नगरपंचायतीत मुख्याधिकारी व वसुली अधिकारी पूर्णवेळ तर नगर अभियंता व प्रभारी लेखाधिकारी व इतर अधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याने शहर विकासाच्या योजना आखण्यात व नागरिकांची कामे होण्यास अडचणी येत असल्याने याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) माढा (जि.सोलापूर) नगरपंचायतीची दिनांक ११/०९/२०१५ रोजी स्थापना करण्यात आली आहे. माढा नगरपंचायतीतील ६ पदे आजमितीस भरण्यात आली असून उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही नगरपरिषद संचालनालयाकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

गोवंडी येथे महापालिकेच्या भूखंडावर अनधिकृत झोपडपट्टीस मंजूरी दिल्याबाबत

(१७) * ३८८३३ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी येथे महापालिकेच्या भूखंडावर न्यु गौतम नगर झोपडपट्टी केवळ फोटोपासच्या आधारावर झोपडपट्टी म्हणून गृहीत धरावी व झोपु योजना मंजूर करावी असा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २७ जून, २०१७ रोजी सादर केला आणि दिनांक २८ जून, २०१७ रोजी हा प्रस्ताव मंजूर केला तसेच या योजनेला तात्पुरते इरादा पत्र प्राधिकरणाच्या इतिहासात प्रथम जारी करण्यात आले तसेच परिशिष्ट-२ प्रलंबित असतानाही सार्वजनिक भूखंडावरील झोपडपट्टी अधिकृत असल्याचे दिनांक २ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना टॅब पुरविण्याबाबत

(१८) * ३८६१८ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रसाद लाड : तारांकित प्रश्न क्रमांक ३५६५१ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण खात्याने इयत्ता ८ वी, ९ वी व १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी टॅब देण्याची योजना सन २०१५ मध्ये सुरु केली त्याकरिता ३ वर्षांसाठी टेक्नो इलेक्ट्रॉनिक लिमिटेड ह्या कंपनीस ३२ कोटी

रुपयांचे कंत्राट देण्यात आले परंतु, सदर कंपनीने पुरवलेल्या १३ हजार टॅबच्या ऑपरेटिंग सिस्टीममध्ये दोष असल्याचे तसेच त्यातील बॅटरीला बीआयएसचे प्रमाणपत्र नसल्यामुळे इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांना या वर्षी टॅब वितरीत करता आले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर टॅबकरिता काढलेल्या निविदांमध्ये मागविण्यात आलेले टॅब हे अत्यल्प गुणवत्तेचे असून त्यामुळे ३ वेळा निविदाकाढूनही महानगरपालिका प्रशासनाला टॅब बनवणाऱ्या कंपन्याकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी निकृष्ट दर्जाचे टॅब पुरविल्याबद्दल टेक्नो इलेक्ट्रोनिक लिमिटेड कंपनीवर आणि संबंधित महानगरपालिका अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सदर टॅब त्वरित विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावेत यासाठी शासनाने महानगरपालिकेला निर्देश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये टेक्नो इलेक्ट्रॉनिक लिमिटेड मार्फत खरेदी केलेले एकूण ४३,८४३ टॅब निविदा प्रक्रियेत मागितलेल्या तांत्रिक तपशिलाप्रमाणे असल्याबाबत महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत खात्री करण्यात आली होती.

तसेच सदर टॅब मधील बॅटरीबाबत बी.आय.एस. चे प्रमाणपत्र कंत्राटदाराने बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केले होते.

सन २०१६-१७ मध्ये खरेदी केलेले टॅब इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. सदर टॅब सन २०१७-१८ मध्ये इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात येणार होते. तथापि, इयत्ता ९ वी चा अभ्यासक्रम बदलल्याने सदर टॅब त्यांना न देता इयत्ता ८ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात आले.

इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांकरीता नव्याने १८,०७८ टॅब खरेदी करण्यासाठी दिनांक ०५/०७/२०१७ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत निविदा काढण्यात आल्या. सदर निविदेस चार वेळा मुदतवाढ दिल्यानंतरही प्रतिसाद न मिळाल्याने इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये टॅब वितरीत करता आले नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

(२) इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी नव्याने १८,०७८ टॅब खरेदी करण्यासाठी दिनांक ०५/०७/२०१७ रोजी काढण्यात आलेल्या निविदेस चार वेळा मुदतवाढ दिल्यानंतर प्राप्त दोन निविदांपैकी लघुत्तम निविदाकारास दिनांक ०६/०२/२०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खरेदी आदेश देण्यात आले आहेत.

(३) सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये टेक्नो इलेक्ट्रॉनिक लिमिटेड मार्फत खरेदी केलेले टॅब निविदेमध्ये नमूद तांत्रिक तपशिलाप्रमाणे असल्याने व कंत्राटदाराने टॅबच्या बॅटरीबाबतचे बी.आय.एस. प्रमाणपत्र सादर केल्याने महानगरपालिकेमार्फत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आलेली नाही.

(४) व (५) इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांना टॅब उपलब्ध करुन देण्यासाठी दिनांक ०६/०२/२०१८ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खरेदी आदेश देण्यात आले आहेत.

इंदोरा (नागपूर) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सर्व अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत

(१९) * ३७८७७ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदोरा (नागपूर) येथे सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) सुरु करण्यात आली असून एकूण १२ ट्रेडपैकी फक्त ४ ट्रेड सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संस्थेला फिटर, इलेक्ट्रिशियन, मशिनिस्ट, एडवांस मॅकेनिकल टूल ऑपरेटर, टूल ॲण्ड ट्रेड या ट्रेडलाच मान्यता मिळाली असून १०० टक्के मशिनरी उपलब्ध झाल्याशिवाय अन्य ट्रेड सुरु करता येत नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उर्वरित अभ्यासक्रम सुरु करण्याकरिता शासनाने मशिनरी खरेदी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) इंदोरा, नागपूर येथे सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांकरिता औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) सुरू करण्यात आली असून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या दिनांक २८/०७/२०१६ च्या शासन निर्णयान्वये एकूण ०६ व्यवसायाच्या १२ तुकडया मंजूर असून त्यापैकी फक्त ०२ व्यवसाय अभ्यासक्रमाच्या ०२ तुकडया सुरू आहेत.

(२) होय, अंशत: खरे आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या शासन निर्णय दिनांक २८/०७/२०१६ अन्वये फॅशन टेक्नॉलॉजी, कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट, इलेक्ट्रीशियन, यांत्रिक मोटारगाडी, मशिनिस्ट व फिटर या ०६ व्यवसाय अभ्यासक्रमाच्या प्रत्येकी ०२ तुकडया अशा एकूण १२ तुकडया मंजूर करण्यात आल्या आहेत.

सदर ०६ व्यवसाय अभ्यासक्रमापैकी फॅशन टेक्नॉलॉजी व कॉम्प्युटर ऑपरेटर ॲण्ड प्रोग्रामिंग असिस्टंट या व्यवसायाच्या प्रत्येकी ०१ तुकडी अशा ०२ तुकडयांना संलग्नता प्राप्त असून ऑगस्ट, २०१७ मध्ये १०० टक्के प्रवेश झालेले आहेत.

उर्वरित ०४ व्यवसायाकरिता व्यवसायाच्या संलग्नतेकरिता १०० टक्के यंत्रसामुग्री व साधनसामुग्री आवश्यक आहे. तथापि, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत सदर यंत्रसामुग्री व साधनसामुग्री पूर्णत: उपलब्ध न झाल्यामुळे उर्वरित व्यवसाय अभ्यासक्रमात प्रवेश करता येवू शकत नाहीत.

(३) सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात यंत्रसामुग्री व साधनसामुग्री यासाठी प्राप्त झालेल्या रुपये १७.५ लाख अनुदानामधून खरेदीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. निधी उपलब्ध झाल्यानंतर यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल. संलग्नतेसाठी आवश्यक १०० टक्के यंत्रसामुग्री व साधनसामुग्री उपलब्ध झाल्यानंतर संलग्नतेची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल व उर्वरित तुकड्या सूरू करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-गोवा जलमार्गावर जलवाहतुक सुरु करण्याबाबत

(२०) * ३८६५८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा यादरम्यानच्या जलमार्गावर पुन्हा जलवाहतुक सुरु करण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने/ जल वाहतुक मंडळ समितीने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार या जलमार्गावरील प्रवासी वाहतुक सुरु करण्याच्यादृष्टीने केंद्र शासनाकडून फिजिबिलिटी रिपोर्ट, नोंदणी प्रमाणपत्र व अन्य आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्या आहेत काय व केंव्हा,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) अंशतः खरे आहे,

(२) व (३) मुंबई ते गोवा व महाराष्ट्र किनारपट्टीवरील बंदरातून प्रवासी जलवाहतुक सुरु करण्याबाबत काही उद्योजकांनी प्रस्ताव सादर केले होते.

अ) त्याअनुषंगाने मे.सुवर्णदुर्ग शिपींग अँड मरिन सर्व्हिसेस या कंपनीस मुंबई-दिघी-दाभोळ-जयगड या जलमार्गावर पर्यटन बोट सुरु करण्यास दिनांक ०८/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आली आहे.

ब) मे.राज लॉजिस्टिक शिपींग या कंपनीस मुंबई (फेरीवार्फ जेट्टी नं.३) येथून महाराष्ट्र राज्य आणि गोवा किनारपट्टी दरम्यान जलवाहतुक सुरु करण्यास दिनांक ०१/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आली आहे.

क) मे.सी ईगल नेव्हिगेशन कंपनीस मुंबई ते गोवा दरम्यान जयगड आणि वेंगुर्ला मार्गे जलवाहतुक सुरु करण्यास दिनांक १६/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये परवानगी देण्यात आली आहे.

ड) तसेच मुंबई गोवा या दरम्यानच्या जलमार्गावर मुंबई बंदर विश्वस्त यांच्याकडून देखील जलवाहतुक सुरु करण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचे समजते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ नगरपरिषदेत नव्याने समाविष्ट केलेल्या ग्रामपंचायत क्षेत्रास मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत

(२१) * ३८३४२ श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ नगरपरिषदेत नव्याने समाविष्ट केलेल्या ग्रामपंचायत क्षेत्रातील मुलभूत सुविधा पूर्ण करण्यास प्रशासन अपयशी ठरत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ व माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यवतमाळ शहरात व नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये स्वच्छतेकडे लक्ष दिले जात नाही, जागोजागी प्राधिकरणाने पाईपलाईन टाकल्यामुळे संपूर्ण शहरातील रस्ते नादुरुस्त झाले असून लोहारा परिसरातील पथदिवे नादुरुस्त स्थितीत आहेत तसेच नागरिकांनी वैयक्तिक शौचालय बांधले परंतु त्याचे अनुदान दिले गेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून आर्थिक मदत व मुलभूत सुविधा पुरवून शहराचा विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत यवतमाळ शहर व वाढीव क्षेत्र गृहीत धरुन संपूर्ण नगरपरिषद क्षेत्रासाठी रुपये २७७.५२ कोटी किंमतीची पाणीपुरवठा योजना शासनाने मंजूर केलेली आहे. सदर योजनेची कामे पूर्ण वेगाने प्रगतीपथावर आहेत. सदर योजनेंतर्गत शहरामध्ये पाईपलाईन टाकण्याच्या कामामुळे नादुरुस्त झालेले रस्ते संबंधित कंत्राटदाराकडून पूर्ववत करुन घेण्यात येणार आहेत.

लोहारा विभागातील विद्युत पथदिवे बंद असल्याबाबत आलेल्या तक्रारीनुसार विद्युत पथदिवे त्वरीत दुरुस्त करण्यात आले आहेत. विद्युत दिवे बंद असल्याबाबतची स्वतंत्र तक्रार नोंदवही ठेवण्यात आली असून त्याद्वारे तक्रार निवारणाची कार्यवाही होते.

यवतमाळ नगरपरिषदेमार्फत प्रति शौचालय रुपये १७,०००/- अनुदानाचे वाटप वैयक्तिक शौचालय बांधकामाच्या भौतिक प्रगतीनुसार ३ टप्प्यात करण्यात येत आहे. त्यानुसार शहरातील ५२०१ लाभार्थी कुटुंबांना वैयक्तिक शौचालय बांधकामाच्या भौतिक प्रगतीनुसार अनुज्ञेय अनुदान वाटप करण्यात आले आहे. त्यातील २५९९ लाभार्थी कुटुंबांना ३ टप्प्यामध्ये पूर्णपणे अनुदान वाटप केले असून ११६१ लाभार्थ्यांना पहिला हप्ता व १४४१ लाभार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचे अनुदानाचे वाटप केले आहे.

(३) नगरपरिषदांच्या वाढीव हद्दीमध्ये मुलभूत सोयी सुविधा पुरविण्याकरिता शासनाकडून अनुदान देण्यात येते. याबाबतचे निकष शासन निर्णय दिनांक २७/०६/२०१२ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत. सदर योजने अंतर्गत यवतमाळ नगरपरिषदेस अनुदान वितरीत करण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात काचेची आच्छादने असलेल्या इमारतींवर बंदी घालण्याबाबत

(२२) * ३९०१३ श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये काचेची आच्छादने असलेल्या इमारतीवर ५ वर्षापूर्वी महानगरपालिकेने बंदी घातली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या मोठया प्रमाणात इमारती उभ्या राहत असून सदरहू इमारतींवर काचेची आच्छादने केल्याचे प्रमाण मुंबई शहरात वाढले असल्याबाबत माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान सामाजिक व राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांचेकडे तसेच शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) ते (४) अशी बाब नाही.

काचेची आच्छादने असलेल्या इमारतींकरिता महानगरपालिकेचे स्तरावर अग्नि सुरक्षा उपाययोजनांची नियमावली तयार करण्यात आली असून त्याप्रमाणे अंमलबजावणी केली जात आहे.

पुणे शहरातील समान पाणीपुरवठा योजनेच्या निविदा प्रक्रियेला मुदतवाढ देण्याबाबत

(२३) * ३८८०१ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील समान पाणीपुरवठा योजनेची नव्याने काढण्यात येत असलेली निविदा घाईने काढली जात असून यात सहभागी होऊ इच्छित असलेल्या कंपन्यांनी निविदेत मागितलेल्या मुदतवाढीबाबत महानगरपालिकेने योग्य निर्णय न घेतल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार उक्त शहरातील समान पाणीपुरवठा योजना योग्यरितीने कार्यान्वित करण्यासाठी व निविदा प्रक्रिया निकोप स्पर्धेत व्हावी यासाठी मुदतवाढ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) पुणे शहरातील समान पाणीपुरवठा योजनेच्या फेरनिविदा मागविण्यासाठी दिनांक १०/११/२०१७ रोजी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती.

निविदा भरण्यासाठीचा अंतिम दिनांक २८/१२/२०१७ असा होता.

यात सहभागी होऊ इच्छित असलेल्या कंपन्यांच्या मागणीनुसार तसेच निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी सदर निविदेस ३ वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

याबाबत पुणे महानगरपालिकेने आवश्यकतेनुसार वेळोवेळी निर्णय घेतलेला आहे.

(२) नवीन निविदा राबविताना निविदा प्रक्रियेत व्यापक स्पर्धा होईल अशा पध्दतीने व निविदा प्रक्रिया पारदर्शी पध्दतीने तसेच नियमानुसार राबविण्याबाबत दिनांक १६/१०/२०१७ च्या पत्रान्वये शासनाने पुणे महानगरपालिकेस सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (प) (जि.ठाणे) येथील पोलीस वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत

(२४) * ३७७४८ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ (प)(जि.ठाणे) येथील पोलिसांच्या निवासाकरिता बांधण्यात आलेल्या इमारती मोडकळीस आल्या असून त्या धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलीस वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर पोलीस वसाहतींचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय.

(३) पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता २५६ शासकीय निवासस्थानांचे बांधकाम महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाने हाती घेतले असून उक्त कामाचे नकाशे व सविस्तर खर्चाचे अंदाज तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीतील आरक्षणाबाबत

(२५) * ३८२४० श्री.मितेश भांगडिया, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मोहनराव कदम : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९१७ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १६ (४) नुसार शासकीय नोकरीत निकषानुसार अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील अधिकारी-कर्मचारी यांच्या पदोन्नतीबाबतची माहिती मा.सर्वोच्च न्यायालयात सादर करावयाची असल्याने आरक्षण कोट्यामधून दिलेल्या पदोन्नतीची माहिती सादर करण्याच्या सूचना शासनाकडून सर्व विभागांना देण्यात आल्या असूनही विभागांकडून माहिती शासनास अप्राप्त असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील मागासवर्गीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्याचा मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाचा निर्णय प्रलंबित असूनही सामान्य प्रशासन विभागाने मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांना पदावनत करण्याचा आदेश जारी केला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी करुन आरक्षण कोट्यामधून दिलेल्या पदोन्नतीची माहिती देण्यास विलंब करणाऱ्यांवर व सामान्य प्रशासन विभागाने मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांना पदावनत करण्याचा जारी केलेला आदेश रद्द करुन सदर आदेश जारी करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) सदर माहिती विभागाकडे उपलब्ध आहे. परंतु, अद्ययावत माहिती उपलब्ध करण्यासाठी विभागांकडून पुनश्च माहिती मागविण्यात आली आहे. आतापर्यंत तीन विभागांकडून माहिती प्राप्त झाली असून उर्वरित विभागांकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

(२), (३) व (४) मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदावनत करण्याचा कोणताही आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित करण्यात आलेला नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीची दूरवस्था झाल्याबाबत

(२६) * ३८२२५ श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीची दूरवस्था झाली असून त्याकरिता शासनाकडून नळपाणी योजनेसाठी निधी मंजूर झाला असताना त्यात अनेक अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शीळ धरणावरून रत्नागिरी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिनीच्या आरसीसी कामाचे कंत्राट अन्वी कन्स्ट्रक्शन ह्या कंपनीस देण्यात आले असून कामाला सुरुवात झाली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जॅक्वेल ते साळवी स्टोप फिल्टर हाऊसपर्यंत येणारी ५०० मीटर व्यासाच्या लोखंडी पाईपलाईनचे काम रत्नागिरी नगरपालिकेकडून कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत रत्नागिरी शहराला ऑक्टोबर, २०१६ मध्ये पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे. तथापि, सदर योजनेचे काम अद्याप सुरु झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) सदर प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेअंती मे.अन्वी कन्स्ट्रक्शन्स, सांगली यांना प्रकल्पाचे कार्यादेश सप्टेंबर, २०१७ मध्ये देण्यात आलेले आहेत.

तथापि, सदर प्रकल्पासंदर्भात विभागीय आयुक्त यांच्याकडे दाखल अपिलाच्या अनुषंगाने प्रकल्पाच्या कामास स्थगिती देण्यात आली आहे.

सदर अपिलाच्या अनुषंगाने तात्काळ निर्णय घेण्याबाबतच्या सूचना विभागीय आयुक्त, कोकण यांना देण्यात आल्या आहेत.

भूमी प्रॉपकॉन, सांगली संस्थेवर कारवाई करण्याबाबत

(२७) * ३८५७९ श्री.मोहनराव कदम, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, आर्कि.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली शहरातील पुष्पराज चौकातील भूमी प्रॉपकॉन संस्थेमध्ये ठेवलेली दहा लाख रुपयांची ठेव परत न दिल्याचे प्रकरण दिनांक २३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून त्यानुषंगाने या संस्थेतील ठेवीदारांचे पैसे परत मिळण्याबाबत व संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) सदर प्रकरणी आरोपीने भुमी प्रॉपकॉन प्रायव्हेट लि. पुष्पराज चौक नावाची कंपनी चालु करुन, फिर्यादिस त्या कंपनीत गुंतवणुक करण्यास भागपाडुन, फिर्यादीकडुन १० लाख रुपये घेवुन, फसवणूक केले प्रकरणी विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३६२/२०१७ भा.दं.वि.कलम ४२०, ४०६, ३४ सह महाराष्ट्र ठेविदारांच्या हित संबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ कलम ३, ४ प्रमाणे दिनांक १९/१२/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी ३ आरोपी निष्पन्न झाले असून, एका आरोपीस अटक करण्यात येऊन, सध्या आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

(३) विलंब झालेला नाही.

चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरात एलईडी दिव्यांच्या कामात अपहार झाल्याबाबत

(२८) * ३८०६४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरात बसविण्यात आलेले एलईडी दिवे महागडे व निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामात अपहार झाला असून हा विषय परिषदेसमोर आणावा यासाठी येथील २० लोकप्रतिनिधींनी लेखी मागणी करुनही दुर्लक्ष करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त कामाची देयके थांबवून या अपहारातील संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) अशा आशयाच्या तक्रारी नगरपरिषद प्रशासनास प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे.

(३) प्रस्तूत प्रकरणी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना चौकशी करुन ४ आठवड्याच्या आत अहवाल सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथे बनावट सीबीआय अधिकाऱ्याने नोकरीचे आमिष दाखवून फसवणूक केल्याबाबत

(२९) * ३८४३३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथे एका बनावट सीबीआय अधिकाऱ्याने एफएलचे लायसन्स काढून देण्याचे तसेच नोकरीला लावण्याचे अमिष दाखवून ६ जणांची ८५ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक केल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) होय.

सदरहू प्रकरणात आरोपीताने फिर्यादी व साक्षीदार यांची फसवणूक केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्याविरुध्द कासारवडवली पोलीस ठाणे येथे गुर.क्र. २७३/२०१७, भा.दं.वि. ४२०, ४०६, १७०, ३४ अन्वये दिनांक ३१/१२/२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन सदरचा गुन्हा तपासावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे देवडे (ता.संगमेश्वर,जि.रत्नागिरी) गावातील बहिष्काराला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(३०) * ३८७०५ श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवडे (ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी) गावाच्या विकासात अडथळा आणणाऱ्या व गावातील बहिष्काराला जबाबदार असणाऱ्यांवर चौकशीअंती गुन्हा नोंदवून कायदेशीर कारवाई करण्याची मागणी मा.गृह राज्यमंत्री यांना लेखी निवेदनाद्वारे दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ पासून वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तंटामुक्ती अध्यक्ष, उपसरपंच, समाजसेवक व पोलीस पाटील यांनी बहिष्कार घातला नसल्याची खोटी माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणी खोटी माहिती देणाऱ्या संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) शासनास दिनांक १३/०१/२०१८ रोजी निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदर अर्ज चौकशीमध्ये मौजे देवडे गावात अर्जात नमूद केल्याप्रमाणे गावात कोणताही बहिष्काराचा प्रकार घडला नसल्याचे निष्पन्न झाले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नवीन नांदेड परिसरात अपघातांचे प्रमाण वाढल्याबाबत

(३१) * ३८५२२ श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन नांदेड परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक लातुर फाटा येथे राज्य रस्ता चौपदरीकरण कामामुळे मागील अनेक दिवसांपासून वाहतुक विस्कळीत होत असून अपघातांचे प्रमाणही वाढले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी शहर वाहतुक सुरळीत करण्यासाठी शहर वाहतुक शाखेमार्फत वाहतुक कर्मचारी नेमण्याची प्रशासनाकडून मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर चौपदरीकरणाच्या कामाला गती देण्याबाबत तसेच वाहतुक कोंडी दूर करण्यासाठी वाहतुक कर्मचारी नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) नविन नांदेड परिसरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर फाटा ते धनेगांव चौक या ४ कि.मी. महामार्गाच्या विस्ताराचे काम चालू असल्यामुळे सदर भागातील रोड वाहतुकीसाठी बंद करण्यात आले होते. त्यामुळे वाहतुक विस्कळीत होत होती. मात्र सदर ठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढले हे म्हणणे खरे नाही. नमूद मार्गावर सन २०१७ मध्ये फक्त एक अपघाताचा गुन्हा घडलेला आहे.

(२) व (३) सदर राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाचे काम सुरु झाल्यापासून तेथे दररोज सकाळी ०८.०० ते रात्री ०९.०० वाजेपर्यंत नियमितपणे शहर वाहतुक शाखेचे कर्मचारी नेमण्यात येतात. सदर मार्गावरील वाहतुक वळविण्यात येत आहे तसेच धनगांव फाटा येथे शहर वाहतुक शाखेचे कर्मचारी नेमण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात सर्वसामान्यांना परवडणाऱ्या घरांची निर्मिती करण्याबाबत

(३२) * ३८९२३ श्री.आनंदराव पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जयंत पाटील : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह मराठवाडा, विदर्भ, कोकण तसेच सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे येथे सर्वसामान्यांना परवडणाऱ्या १५ लाख घरांची निर्मिती करण्यात येईल अशी घोषणा मा.गृहनिर्माण राज्यमंत्री महोदयांनी माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये व त्यादरम्यान केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही घरे उभारण्याबाबत शासनाने कोणता कालबध्द कार्यक्रम आखला आहे काय तसेच सदर योजनेचे स्वरुप कशाप्रकारचे आहे व सदर योजनेची सुरुवात कधीपासून करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) व (२) केंद्र शासनाने सर्वांसाठी घरे - २०२२ या संकल्पनेवर आधारित प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) जून, २०१५ मध्ये घोषित केली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर योजना राज्यात प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने मा.राज्य मंत्रिमंडळाच्या मान्यतेनुसार शासनाने दिनांक ९ डिसेंबर, २०१५ रोजी त्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार प्रधानमंत्री आवास योजना नागरी क्षेत्राकरिता ४ घटकांमध्ये राबविण्यात येत आहे. सद्य:स्थितीत सदर योजना राज्यातील एकूण ३८२ शहरांमध्ये राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत सन २०२२ पर्यंत राज्यात एकूण १९.४० लक्ष घरकुलांच्या बांधकामाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सदर योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी लाभार्थ्यांना केंद्र शासनाकडून रुपये १ ते १.५ लक्ष तर राज्य शासनाकडून रुपये १.० लक्ष अनुदान देण्यात येते. याशिवाय आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना पहिल्या दस्ताला रुपये १०००/- इतके मुद्रांक शुल्क निश्चित करण्यात आलेले आहे. तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आणि अल्प उत्पन्न गटासाठीच्या गृहप्रकल्पांना २.५ चटई क्षेत्रफळ निर्देशांक

अनुज्ञेय करण्यात आलेला असून अशा गृहप्रकल्पांना संयुक्त मोजणी फी मधून आणि विकासशुल्कातून ५०% सूट देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेने पात्र झोपडीधारकांच्या झोपड्या तोडल्याबाबत

(३३) * ३८६९९ श्री.रामनिवास सिंह, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील कुर्ला ते पवई पर्यंत तानसा पाईपलाईन लगत वसलेल्या झोपडयांवर महानगरपालिकेकडून बुलडोजर फिरविण्याची कारवाई सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर झोपडया पात्र असून झोपडीधारकांचे अन्य ठिकाणी पुनर्वसन केलेले नसतानाही महानगरपालिकेकडून झोपडया तोडण्याची कारवाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापूर्वीही सांताक्रूझ परिसर ते तानसा पाईपलाईन लगत स्थित असलेल्या झोपडया हटविण्याची कारवाई महानगरपालिकेकडून करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्रमांक १४०/२००६ मधील आदेशानुसार, जलवाहिनीच्या दोन्ही बाजूस १० मी. अंतरावरील महानगरपालिकेच्या संपादित जागेवर असलेल्या अनधिकृत झोपड्यांवर निष्कासनाची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

तथापि, निष्कासनाची कार्यवाही करण्यापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पात्र झोपडीधारकांना पर्यायी सदनिका उपलब्ध करुन देण्यात येतात.

कुर्ला ते पवई पर्यंत तसेच सांताक्रुझ परिसरात, तानसा पाईपलाईन लगतच्या झोपडयांवर मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अशा प्रकारची निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेतील सातारा व देवळाई वॉर्डासाठी स्वतंत्र प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याबाबत

(३४) * ३८५५७ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेने सातारा व देवळाई वॉर्डासाठी एका रुग्णालयाची सेवा सुरु केल्यामुळे देवळाईतील नागरिकांना आठ किलोमीटर पेक्षा जास्त लांब जाऊन उपचार घ्यावे लागत असल्याने त्यांना त्रास सहन करावा लागतो त्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष पसरला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सातारा व देवळाई वॉर्डासाठी स्वतंत्र प्राथमिक आरोग्य केंद्र उभारण्याची नागरिकांच्या होत असलेल्या मागणीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) औरंगाबाद महानगरपालिकेंतर्गत सातारा येथे नागरीकांना वैद्यकीय सेवा देण्याच्या दृष्टीकोनातून एक आरोग्य केंद्र सुरु करण्यात आलेले आहे.

देवळाई भाग हा सातारा आरोग्य केंद्रापासून अंदाजे ४ ते ५ कि.मी. अंतरावर आहे. सदर आरोग्य केंद्रामध्ये देवळाई परिसराचाही अंतर्भाव करण्यात आलेला असून सातारा व देवळाई परिसरातील नागरिकांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात देवळाई विभागात महानगरपालिकेमार्फत आरोग्य केंद्र सुरु करण्याचे प्रस्तावित असून कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला शहरातील शैक्षणिक कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतीवरील मालमत्ता कर व इतर कर माफ करण्याबाबत

(३५) * ३८१७६ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला शहरातील विविध शैक्षणिक संस्था पूर्णतः धर्मादाय स्वरुपाच्या असून त्यांच्या मालकीच्या इमारतीचा वापर शैक्षणिक कार्यासाठी केला जातो व संस्थेच्या कोणत्याही सभासदाला कोणत्याही लाभांश संस्थेद्वारा दिला जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोला शहरातील संस्थाचा शैक्षणिक कार्यासाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतीवरील मालमत्ता कर व इतर कर माफ करणेबाबत शासनस्तरावर प्रस्ताव विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला येथे नोंदणीकृत असलेल्या धर्मादाय स्वरुपाच्या शैक्षणिक संस्थांपैकी ज्या संस्थांकडे स्वत:च्या मालकीच्या इमारती आहेत, त्या संस्था इमारतीचा वापर शैक्षणिक कार्यासाठी करतात व ज्या संस्थांकडे स्वत:च्या मालकीच्या इमारती नाहीत, अशा संस्था भाड्याच्या इमारतींचा वापर शैक्षणिक कार्यासाठी करतात. संस्था नोंदणी अधिनियम, १८६० व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० नुसार संस्थेच्या कोणत्याही सभासदाला कोणताही लाभांश संस्थेमार्फत देण्याची तरतूद नाही.

(२) असा कोणताही प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

शिरूर कासार (जि.बीड) नगरपंचायतीच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

(३६) * ३९८५२ श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरूर कासार (जि.बीड) नगरपंचायतीने दिनांक १९ जुलै, २०१७ रोजी विविध कामांच्या प्रसिद्ध केलेल्या निविदा दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजी बेकायदेशीररित्या रद्द केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मा.नगरविकास राज्यमंत्री यांच्याकडे दाखल तक्रार पुढील कार्यवाहीसाठी दिनांक २ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास प्रधान सचिव, नगरविकास (न.वि.-२) यांच्याकडे पाठविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नगरपंचायतीने दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पुन्हा बेकायदेशीररीतीने निविदा रद्द करून कंत्राटदारांची अनामत रक्कम विहित मुदतीत संबंधितांना अदा केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषीविरुद्ध कारवाई करून नगरपंचायतीचे काम पारदर्शक व स्पर्धात्मक प्रक्रियेने होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक १९/०८/२०१७ अन्वये जी.एस.टी.च्या अंमलबजावणीमुळे शासकीय कंत्राटावरील कररचनेवर परिणाम होणार असल्याने त्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

त्यानुसार नगरपंचायत, शिरुर कासार यांनी दिनांक १९ जुलै, २०१७ रोजी विविध कामाच्या प्रसिद्ध करण्यात आलेल्या ई-निविदा दिनांक १७/११/२०१७ च्या पत्रान्वये रद्द करुन संबंधित कंत्राटदारास अनामत रकमेचे

डी.डी. परत करण्यात आले आहेत. तसेच सदर कामांकरीता दिनांक २२/११/२०१७ रोजी पुनश्च: निविदा मागविण्यात येऊन सर्वात कमी दर असणाऱ्या निविदाधारकांना कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

काळबादेवी, मुंबई येथील आगीच्या दुर्घटनेत शहीद झालेल्या अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना सवलती देण्याबाबत

(३७) * ३९८९७ श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काळबादेवी, मुंबई येथील गोकुळ निवास इमारतीला लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत शहीद झालेल्या अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना मागील दोन वर्षांचा कालावधी पूर्ण झाला असूनही कोणत्याही सवलती दिल्या नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्तव्य बजावत असताना स्वत:चे प्राण गमावलेल्या या अधिकाऱ्यांना शहीद दर्जा मिळावा म्हणून महापालिकेने पाठविलेल्या प्रस्तावाला माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने मंजुरी देऊनही या चार शहीद अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना सुविधा दिल्या जात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहीद अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना सुविधांपासून वंचित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) काळबादेवी येथील गोकुळ निवास इमारतीला लागलेल्या आगीच्या दुर्घटनेत वीरमरण आलेल्या अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना शहीद दर्जा व शहीदांना अनुज्ञेय असणाऱ्या सवलती आणि फायदे देण्याचा शासन निर्णय दिनांक २२/०७/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर चार शहीद अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना खालीलप्रमाणे सुविधा देण्यात आल्या/येत आहेत :-

- सदर अधिकाऱ्यांना त्यांच्या पदाच्या वर्गवारीनुसार कायमस्वरुपी सदनिका देण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून, सद्य:स्थितीत जोपर्यंत सदनिका उपलब्ध होत नाही तोपर्यंत त्यांना अग्निशमन दलाच्या सेवा निवासस्थानात राहण्याची सुविधा देण्यात आली आहे.
- श्री.एस. डब्ल्यू. राणे यांच्या मुलाला कनिष्ठ अभियंता पदावर व श्री.एम. एम. देसाई यांच्या पत्नीला लिपिक पदावर नोकरी देण्यात आली आहे.
- श्री.एस. जी. अमिन यांच्या एका अपत्याला सज्ञान झाल्यानंतर व श्री.एस. एच. नेसरीकर यांच्या मुलाला अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला आहे.
- सदर शहीद अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना मृत्यू नुकसान भरपाई, शिल्लक रजा रोखीकरणाची रक्कम तात्काळ मदतीसह देण्यात आली आहे.
- शहीद अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान देण्यासाठी प्रत्येकी रुपये २५ लाख इतक्या रकमेची तसेच, त्यांच्या मुलांच्या पदवीपर्यंतच्या शिक्षणासाठी रुपये ३ लक्ष इतक्या रकमेची तरतुद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.
- सदर अधिकारी मृत झालेले नाहीत असे समजून या अधिकाऱ्यांना वेतन व पदोन्नतीचे सर्व फायदे सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.
- शहीद श्री.नेसरीकर व श्री.देसाई हे पदोन्नती क्षेत्रात येत असल्याने, त्यांचे पदोन्नतीचे प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत.
- स्थायी समितीच्या मंजुरीने सेवानिवृत्ती पर्यंतच्या वेतनाचे अधिदान शहीद अधिकाऱ्यांच्या वारसांना देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

डहाणू (जि.पालघर) येथील समुद्रात बोट उलटल्याने विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याबाबत

(३८) * ४०१२९ श्री.आनंद ठाकूर, श्री.बाळाराम पाटील, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.जयंत पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.रविंद्र फाटक, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) येथील के.एल.पोंदा कनिष्ठ महाविद्यालयातील सहलीसाठी गेलेल्या विद्यार्थ्यांच्या बोटीला अपघात होऊन बोट समुद्रात उलटल्याने ८ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार जखमी व मृत विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत व सदर बोटीची रितसर नोंदणी न केलेल्या बोट मालकाविरुध्द तसेच संबंधित महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्य शासनाने सागरी सुरक्षेसाठी घेतलेल्या स्पीडबोटी नादुरुस्त असल्याने बऱ्याच कालावधीपासून विविध ठिकाणी सागरी किनाऱ्यालगत बंद अवस्थेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्पीडबोटी दुरुस्त करून सागरी सुरक्षेसंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) मुख्यमंत्री सहाय्यक निधीतून अपघातात मृत्यू झालेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्यात आली आहे. पोलीस विभागाकडून बोटीचे चालक, मालक व खलाशी यांचेविरुध्द भा.दं.वि.सं. कलम ३०४(अ), २८० २८२ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सागरी सुरक्षा योजनेंतर्गत केंद्र शासनाकडून मे.गोवा शिपयार्ड लि. व राज्य शासनाकडून मे.मरीन फ्रंटीयर्स प्रा.लि. यांनी पोलीस दलास सागरी सुरक्षा गस्तीस पुरवठा केलेल्या स्पीड नौकांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी मे.गोवा शिपयार्ड लि.गोवा यांच्यासोबत शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक ०६/१२/२०१७ अन्वये वार्षिक देखभाल व दुरुस्ती सेवा करार करण्यात आलेला आहे. त्यांच्यामार्फत पोलीस स्पीड नौका नादुरुस्त झाल्यास दुरुस्त करण्यात येतात. दुरुस्तीनंतर जास्तीत जास्त स्पीड बोटी दैनंदिन सागरीगस्तीकरीता उपलब्ध करुन देण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.तुळजाभवानी देवस्थानातील दानपेटीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(३९) * ४०१५३ श्री.सुजितसिंह ठाकूर : दिनांक २ ऑगस्ट, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक २४२७५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात

सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री.तुळजाभवानी देवस्थानातील दानपेटीत झालेल्या गैरव्यवहाराची चालू असलेली गुन्हे अन्वेषण विभागाकडून सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी अहवालात काय आढळून आले व त्यानुसार दोषी व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.

तुळजाभवानी देवस्थानातील दानपेटीत झालेल्या गैरव्यवहारासंदर्भातील चौकशी अहवाल राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक २१/०२/२०१८ रोजी सादर केला आहे. त्यावर पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) विलंब झालेला नाही.

मौजे कोलशेत (जि.ठाणे) येथील जमिनीवर आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी शासनाचे आदेश डावलून विकासकास परवानगी दिल्याबाबत

(४०) * ३७६४७ श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोलशेत (जि.ठाणे) येथील सर्व्हे नं. ११४/४, ११५/२ या आदिवासी कुळ असलेल्या जमिनी आणि सर्व्हे नं. ९९/२ ही औद्योगिक कारणासाठी वितरीत केलेल्या जमिनीवर एकत्रित (Amalgamation) करुन मे.मॅन सिअलिटी प्रा.लि. या विकासकास आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी शासनाचे आदेश डावलून परवानगी दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी इमारत बांधून विकासकाने महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांशी संगनमत करून शासन व ग्राहकांची फसवणूक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सक्षम यंत्रणेमार्फत चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार आयुक्त, ठाणे महानगरपालिका व संबंधितांवर गुन्हे दाखल करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) मौजे कोलशेत येथील सर्वे नं. ११४/४, ११५/२ व ९९/२ या भूखंडावरील विकास प्रस्तावास ठाणे महानगरपालिकेने दिनांक ११/०१/२०१६ रोजी मान्यता दिली.

या सर्वे नंबरचे क्षेत्र खालीलप्रमाणे आहे :-

सर्वे नं.	क्षेत्र / चौ.मी.
११४/४	२४१००
११५/२	७९७०
९९/२	१९५८९

- सर्वे क्र. ९९/२ बाबत शासन स्तरावर विक्री परवानगी व वापर बदलाबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असल्याने ९९/२ क्षेत्र वगळता सर्वे नं. ११४/४, ११५/२ वरील बांधकामास दिनांक २४.०२.२०१६ रोजी परवानगी देण्यात आली असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
- विधीमंडळाचे सन २०१६ चे पाचवे (हिवाळी) अधिवेशनामधील लक्षवेधी सूचना क्र. १२९१ अंतर्गत मा.महसूल मंत्री यांनी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने नगर विकास-१ यांनी दिनांक ०६/०१/२०१७ रोजीच्या पत्राने दिलेल्या सूचनेनुसार उक्त भूखंडावरील सुरू असलेल्या बांधकामास ठाणे महानगरपालिकेने १५ दिवसाकरीता स्थगिती दिली.
- या स्थगितीविरुध्द मे.मॅन रिॲलिटी यांनी मा.उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली व दिनांक १८/०१/२०१७ रोजी मा.उच्च न्यायालयाने शासनाच्या दिनांक ०६/०१/२०१७ च्या पत्रास स्थगिती दिली.
- दिनांक ०५/०४/२०१७ रोजी नगर विकास विभागाने सर्वे नं. ९९/२ चे हस्तांतरण अथवा जमिनीच्या वापरात बदल करण्यास शासनाने परवानगी दिली नसताना ठाणे महानगरपालिका यांनी दिनांक ११/०१/२०१६ व दिनांक २४/०२/२०१६ च्या पत्रान्वये सर्वे नं. ११४/२ व ११५/२ व ९९/२ या भूखंडावर नव्याने एकत्रित विकास आराखड्यास व बांधकाम परवानगी चुकीची दिली असल्याने सदर परवानगी तातडीने रद्द करावी अशा सूचना ठाणे महानगरपालिका यांना दिल्या.

- तद्नुषंगाने ठाणे महानगरपालिकेने दिनांक २६/०४/२०१७ रोजी संबंधित विकासक व वास्तुविशारद यांच्याकडून खुलासा प्राप्त केला.
- दिनांक ०३/०७/२०१७ रोजी संबंधित वास्तुविशारद यांनी सर्वे क्र. ९९/२ चे क्षेत्र भूनिर्देशांकातून वगळून व त्यावर कोणतेही बांधकाम प्रस्तावित न करता विकासक यांनी सादर केलेल्या सुधारीत प्रस्तावास ठाणे महानगरपालिकेने विषयांकीत जागेबाबत शासनाचा निर्णय विकासकावर बंधनकारक राहील या अटीवर दिनांक ११/०८/२०१७ रोजी मान्यता दिली.

(२), (३) व (४) सर्वे क्र. ११४/४, ११५/२ या भुखंडाच्या ७/१२ उताऱ्यावर नव्याने झालेल्या कुळाच्या नोंदी असताना ठाणे महानगरपालिकेने या बांधकाम प्रस्तावास बांधकाम परवानगी का दिली तसेच या प्रकरणी परवानगी देताना ठाणे महानगरपालिकेने कर्तव्य कसूर केला आहे किंवा कसे याबाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येणार आहे.

तसेच उक्त प्रकरणी ठाणे महानगरपालिकेने अद्यापही जोता प्रमाणपत्र दिले नसल्याचे कळविले आहे. परंतु असे असताना या ठिकाणी संबंधित विकासकांनी बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आल्याने या प्रकरणी संबंधित विकासकाविरुध्द आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

तसेच या इमारतीमध्ये कोणत्याही व्यवहाराचे दस्त करण्यात येऊ नये अशा सूचना नोंदणी महानिरीक्षक यांना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच उक्त प्रकरणी बांधकाम स्थळावर अद्याप जमिनीचे अधिकारांबाबत शासन स्तरावर सुनावणी सुरू असून ग्राहकांनी सदनिका खरेदी करण्याबाबत व्यवहार करु नये असे फलक उक्त बांधकामाच्या ठिकाणी लावण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

मौजे चिकणघर (जि.ठाणे) येथे बेकायदेशीरपणे विकास हक्क हस्तांतरण (टिडीआर) मंजूर केल्याबाबत

(४१) * ३८५५४ ॲड.अनिल परब : तारांकित प्रश्न क्रमांक २८२७१ ला दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील मौजे चिकणघर येथील आरक्षण क्रमांक १९२ ते १९७ या मोबदल्यात हक्क विकास हस्तांतरण (टिडीआर) बेकायदेशीरपणे मंजूर केल्याप्रकरणी विधानपरिषदेत सातत्याने विविध आयुधांद्वारे सभागृहाचे/शासनाचे लक्ष वेधूनही यासंदर्भात विसंगती दर्शविणारे खोटे उत्तर सभागृहाला दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त आरक्षित जागेवर सद्यःस्थितीमध्ये झोपडपट्ट्या आहेत, तसेच तेथे शेती केली जात आहे असे असतानाही प्रशासनाच्या जबाबदार अधिकाऱ्याकडून कोणत्याही प्रकारचे बेकायदेशीर / अनधिकृत बांधकाम नसल्याचा अहवाल शासनास पाठवूनही शासनाची देखील फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची अतांत्रिक चौकशी अधिकारी, श्री.भि.रा.उके यांच्याकडून चौकशी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त बाब ही तांत्रिक बाब असताना याबाबत चौकशी ही अतांत्रिक चौकशी अधिकाऱ्याकडून करण्याबाबतची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार खोटा अहवाल प्रशासनाला सादर केल्याप्रकरणी अतांत्रिक चौकशी अधिकारी, श्री.भि.रा उके यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

महानगरपालिकेने हस्तांतरणीय विकास हक्क प्रदान करतेवेळी अतिक्रमणविरहीत जागेचा ताबा घेतला आहे व त्यानुसार हस्तांतरणीय विकास हक्क प्रदान केले आहेत. सदर जागेवर आजमितीस अतिक्रमण नसून जागा मोकळी आहे. मात्र काही भागात २ x २ आकाराचे चौथरे उभारुन पुतळे उभारण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे आजूबाजूचे नागरिक मोसमात भाजीपाला लावतात. तथापि, सदरहू जागेची मालकी आजही महापालिकेची आहे.

(३), (४) व (५) विभागीय चौकशी प्रकरणे कंत्राटी पध्दतीने निकाली काढण्यासाठी सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांचे पॅनल शासनातर्फे दिनांक २२/१०/२०१३ रोजी जाहिर करण्यात आले आहे व तद्नंतर दिनांक ३०/३/२०१५ अन्वये आणखी काही कंत्राटी चौकशी अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे. सदर यादीत श्री.भि.रा.उके, सेवानिवृत्त सहसचिव यांचे नाव समाविष्ट असून, त्याअनुषंगाने श्री.उके यांची कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने दिनांक २/६/२०१५ च्या आदेशान्वये चौकशी अधिकारी म्हणून प्रस्तूत प्रकरणी नियुक्ती केली आहे व त्या अनुषंगाने प्रस्तुत चिकणघर टिडीआर वाटप विषयक विभागीय चौकशी प्रकरण श्री.उके यांच्याकडे दिनांक ११/३/२०१६ च्या आदेशान्वये महानगरपालिकेकडून सोपविण्यात आले. श्री.भि.रा.उके, चौकशी अधिकारी यांनी सदर प्रकरणी त्यांचा चौकशी अहवाल दिनांक २५/५/२०१७ रोजी महानगरपालिका प्रशासनास सादर केला व त्यावर महानगरपालिका प्रशासनाने निर्णय घेतला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथील कोलशेत भागात संशयास्पदरित्या फिरणाऱ्या जम्मू-काश्मिरमधील तरुणाला कापूरबावडी पोलिसांनी अटक केल्याबाबत

(४२) * ३७६७५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कोलशेत भागातील हवाईदल तळाच्या उच्च सुरक्षा भिंतीजवळ संशयास्पदरित्या फिरणाऱ्या जम्मू-काश्मिरमधील ३५ वर्षीय तरुणाला कापूरबावडी पोलिसांनी दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच्यावर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व सदर तरुणाच्या चौकशी दरम्यान आणखी कोणती माहिती प्राप्त झाली आहे,

(३) तसेच, या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.

दिनांक ०२/०१/२०१८ रोजी संशयास्पदरित्या फिरणाऱ्या आरोपीस अटक केली आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत मधील कापुरबावडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. । ०२/२०१८ भा.दं.वि. कलम ४४७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चौकशी दरम्यान आरोपी सोडून गेलेल्या पत्नीचा शोध घेत ठाणे येथे आलेला होता व त्याला रस्ता माहिती नसल्याने सदर ठिकाणी तो पोहोचला असे चौकशीत समोर आले आहे.

संशयास्पद फिरणाऱ्या आरोपीस अटक करण्यात आली असून सदरच्या आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कराच्या उत्पन्नात घट झाल्याबाबत

(४३) * ३९१८८ श्री.बाळाराम पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दिनांक १७ मार्च, २०१७ रोजीच्या अधिसुचनेनुसार लोखंड व पोलाद या वस्तू वरील कर रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल महानगरपालिकेस अपेक्षित रक्कम रुपये १२० कोटी उत्पन्नाचे नुकसान झाले असून रक्कम रुपये ५० कोटी पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर माफ केला असल्याने पनवेल महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कराच्या उत्पन्नात घट झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १ जानेवारी, २०१७ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ या कालावधीतील ९५.८५ कोटी रक्कम येणे, असलेली थकित रक्कम रुपये १७३.३८ आणि लोखंड व पोलाद या करीता देण्याकरता आलेली सुट रुपये १२० कोटी, असे एकूण रक्कम रुपये ३८९.४३ कोटी रूपयाचे पूरक अनुदान महानगरपालिका तातडीने मिळण्याची गरज निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने दिनांक १ जुलै, २०१७ रोजीनुसार महापालिकेस वस्तु व सेवा कराचे (शेस) अनुदान दरमहा महापालिकेस वितरीत करण्यासाठी काय उपाययोजना करणार आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १ जानेवारी, २०१७ पासून स्थानिक संस्था कर लागू करण्यात आला. त्यानंतर, व्यापारी संघटनांची मागणी विचारात घेऊन कोणतीही प्रक्रिया न करता फक्त विक्री करण्यासाठी प्रवेश करणाऱ्या लोखंड व पोलाद या वस्तूवर स्थानिक संस्था कर न आकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या बाबतची अधिसूचना दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही. स्थानिक संस्था कर हा जकातीला पर्याय म्हणून महानगरपालिका क्षेत्रात आकारला जाणारा कर आहे. पनवेल नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये माहे ऑक्टोंबर, २०१६ मध्ये रुपांतर झाले आहे. दिनांक १ जानेवारी, २०१७ पूर्वी पनवेल नगरपालिका अथवा महानगरपालिका क्षेत्रात कोणतीही प्रक्रिया न करता फक्त विक्री करण्यासाठी प्रवेश करणाऱ्या लोखंड व पोलाद या वस्तुवर कोणताही कर आकारला जात नव्हता, त्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) राज्यात स्थानिक संस्था कर प्रणाली रद्द होवून दिनांक ०१ जुलै, २०१७ पासून महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ ची अंमलबजावणी सुरू झाली आहे. महाराष्ट्र वस्तु व सेवा कर (स्थानिक प्राधिकरणांना भरपाई देण्याबाबत) अधिनियम-२०१७ अन्वये राज्यातील महानगरपालिकांना अनुदान देण्यात येत आहे. पनवेल महानगरपालिकेच्या बाबतीत अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

मुंबईतील चेंबूर मधील सुभाषनगर येथील भाऊ प्रधान उद्यान विकासकाने अनधिकृतपणे बंद केल्याबाबत

(४४) * ३८०७३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूर मधील सुभाषनगर येथील भाऊ प्रधान उद्यानाभोवती १२ फुट उंचीचे पत्रे लावून हे उद्यान एका विकासकाने अनधिकृतपणे बंद केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचे उद्यान विकासकाने नागरीकांसाठी खुले न केल्यास तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी आंदोलन करण्याचा इशारा महानगरपालिकेला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात आढळून आले व तद्नुसार सदर उद्यान नागरीकांसाठी खुले करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांचेकडून प्राप्त अहवालानूसार हे खरे नाही. विकासकाने पुनर्विकास करावयाच्या इमारतीस पत्रे लावले आहेत. भाऊ प्रधान क्रिडांगणाचे प्रवेशव्दार पूर्णपणे खुले आहे.
(२) हे खरे आहे. सदर प्रकरणी स्थानिक नगर सेविका व नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सदर क्रिडांगण बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केले असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सबब, सदर तक्रारी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात आल्या आहेत, असे म्हाडाच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(३) भाऊ प्रधान क्रिडांगणाचे प्रवेश व्दार पूर्णपणे खुले असून विकासकाने फक्त पुनर्विकास करावयाच्या इमारतीस पत्रे लावल्याचे आढळून आले आहे. सदर क्रिडांगण बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरीत केले असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

जळगाव येथील एमआयडीसीतील गितांजली केमिकल्स या कंपनीमध्ये बॉयलरचा स्फोट होऊन कामगार जखमी झाल्याबाबत

(४५) * ३८५१९ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव येथील एमआयडीसीतील गितांजली केमिकल्स या कंपनीमध्ये बॉयलरचा स्फोट होऊन सुमारे १५ कामगार जखमी झाले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वीही अशाच प्रकारच्या तीन घटना या कंपनीमध्ये घडल्या असून कंपनीतील दोन कामगार मृत्यूमुखी पडले असतांनाही व्यवस्थापनाने कामगारांच्या सुरक्षेकरिता कोणतीही उपाययोजना केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनी व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे अशा घटनांमध्ये सातत्याने वाढ झाली असून कामगारांच्या जीवाशी खेळणाऱ्या या कंपनीच्या व्यवस्थापनाविरुध्द शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे अंशतः खरे आहे,

दिनांक ०७/०१/२०१८ रोजी जळगांव येथील औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) क्षेत्रातील गितांजली केमिकल्स प्रा.लि. या कारखान्यात बॉयलरचा स्फोट झालेला नसून कारखान्यातील रिॲक्टरमध्ये स्फोट झालेला आहे. या घटनेत एकूण ०९ कामगार जखमी झालेले आहेत.

(२) गिताजंली केमिकल्स प्रा.लि., या कारखान्यामध्ये यापूर्वी स्फोटाच्या तीन घटना घडल्या नसून दिनांक ०६/१०/२००६ रोजी एक घटना घडली होती. त्यामध्ये चार कामगार जखमी झाले होते. त्या जखमीपैकी एका कामगाराचा मृत्यू झाला. सदरहू घटनेनंतर व्यवस्थापनाने कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना केली आहे.

(३) दिनांक ०६/१०/२००६ रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने भोगवटादाराविरूध्द कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७A(२)(a) च्या कायदे भंगाबाबत न्यायालयात खटला दाखल करण्यात आला होता. तथापि सदर कारखान्याच्या मालकाचा मृत्यू झाल्या कारणाने मा.न्यायालाने दिनांक १२/०६/२००९ रोजी खटला बंद केला.

दिनांक ०७/०१/२०१८ रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने आढळलेल्या कायदे भंगाबाबत भोगवटादाराविरुध्द न्यायालयात तीन खटले दाखल करण्यात आले आहेत.

तसेच या घटनेच्या अनुषंगाने संबंधित विभागाचा, उत्पादन प्रक्रियेसाठी वापर न करणे बाबत, कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ४०(२) अन्वये दिनांक १९/०१/२०१८ रोजी आदेश पारित केलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मोहोळ (जि.सोलापूर) नगरपरिषदेतील नागरिकांना सोयी-सुविधा पुरविणेबाबत

(४६) * ३८२५३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहोळ (जि.सोलापूर) येथील ग्रामपंचायतीचे नगरपरिषदेत रुपांतर होऊन १९ महिन्याचा कालावधी पूर्ण झाला असूनही अद्याप आवश्यक त्या सोयी-सुविधा शासनाने उपलब्ध करुन न दिल्याने नागरिकांची होणारी गैरसोय "जैसे थे" असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपरिषदा केल्या परंतू त्याकडे लक्ष दिले नाही कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले नाही तसेच अनेक पदे रिक्त आहेत त्यामुळे नगराध्यक्षांना लोकांच्या समस्या सोडविण्याबाबत अडचणी येत असल्याने या प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) सोयी-सुविधाअभावी नागरिकांची गैरसोय होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही. शासनाने सन २०१६-१७ मध्ये मोहोळ नगरपरिषदेला नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य म्हणून रुपये ५० लाख तर सर्वसाधारण रस्ता अनुदान म्हणून रुपये ३५ लाख एवढा निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यानुसार नगरपरिषदेकडून उपलब्ध निधीतून आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्यात येत आहेत.

(२) मोहोळ नगरपरिषदेतील ९ पदे आजमितीस भरण्यात आली असून उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही नगरपरिषद संचालनालयाकडून करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासाबाबत

(४७) * ३८८३६ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.मोहनराव कदम : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासासाठी नवे सुधारित धोरण तयार केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सुधारित धोरणामध्ये मुंबईतील पश्चिम व पूर्व उपनगरातील ५० हजारांहून अधिक खाजगी जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत कुठलेही धोरण तयार करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईतील सर्वच जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता असल्याने या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३(५) मधील तरतूदीनुसार मुंबईतील म्हाडा अभिन्यासातील वसाहतींचा पुनर्विकास करण्यात येतो.

दिनांक ०२/०९/२०१६ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत घाटकोपर येथे घोषित केलेल्या गृहनिर्माण धोरणाच्या प्रथम टप्प्यात म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासाबाबत गती येण्याकरिता विनियम ३३ (५) मध्ये काही सुधारणा करुन त्यानुसार नगर विकास विभागाकडून दिनांक ०३/०७/२०१७ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

(२) व (३) नगर विकास विभागाकडून दिनांक ०३/०७/२०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली अधिसूचना ही केवळ म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाकरीता असल्याने त्यामध्ये इतर मुंबई शहर व उपनगरातील खाजगी जुन्या इमारतींचा समावेश करता येऊ शकत नाही. तथापि, मुंबई शहर व उपनगरातील उपकर प्राप्त नसलेल्या धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाकरीता शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील कलम ३७(१कक)(ग), दिनांक ०८/०९/२०१७ अन्वये सुधारित अधिसूचना प्रसिध्द केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर मधील आशीर्वाद नगर येथील एन.आय.टी. मार्केटबाबत

(४८) * ३७९४३ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील आशीर्वाद नगर येथील एन.आय.टी. मार्केट गेल्या २५ वर्षापासून बंद स्थितीत असून तेथे भाजीपाला न विकता गॅरेज व पानटपऱ्या सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्याधुनिक असे मार्केट तयार करण्यात आले असतानाही तेथे एकाही व्यापाऱ्याने दुकान सुरु केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अत्याधुनिक मार्केट सोडून रिंगरोड व आशीर्वाद चौकातच व्यापारी आपली दुकाने मांडत असल्याने वाहतुकीस अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, व्यापाऱ्यांनी आपला माल मार्केटमध्येच विकावा अन्यत्र विकण्यास बंदी करावी याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, अंशत: खरे आहे.

नागपूर, आशीर्वाद नगर मधील भाजी बाजारामध्ये एकूण १३९ दुकाने व २०७ ओटे असून, यापैकी वाटप झालेल्या १०९ दुकानापैकी ३१ दुकाने व १६५ ओट्यापैकी ३७ ओटे प्रत्यक्ष वापरात आहेत.

यातील कांही वापरकर्त्यांनी, त्यांच्या सोईनुसार तेथे गॅरेज व पान टपऱ्याद्वारे व्यवसाय करीत असल्याचे, नागपूर सुधार प्रन्यासने कळविले आहे.
(३), (४) व (५) आशीर्वाद नगर चौकात तसेच मार्केट परिसरात अतिक्रमित दुकाने, टपऱ्या व फेरीवाल्याकडून होणाऱ्या रस्त्यावरील अतिक्रमणावर नागपूर महानगरपालिकेकडून वारंवार अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई केली जाते.

कोपरी (पूर्व), ठाणे येथील औद्योगिक प्रशिक्षण केंद्राकरिता नवीन इमारत बांधण्याबाबत

(४९) * ३८६६३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोपरी (पूर्व), ठाणे येथील औद्योगिक व तंत्र प्रशिक्षण देणारे एकमेव केंद्र कार्यान्वित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर केंद्रामध्ये तंत्रशिक्षण अभ्यासक्रम शिकण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी येत असून या केंद्रात इयत्ता बारावी समांतर व्यवसाय शिक्षण अभ्यास शिकणारे विद्यार्थी देखील शिक्षण घेत आहेत. तथापि, या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण घेण्यासाठी

आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा तेथे उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाचे प्रशिक्षण घेण्यापासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तंत्रशिक्षण केंद्राची इमारत देखील जुनी झाली असून अत्यंत धोकादायक स्थितीत असल्याने नवीन इमारत बांधण्याच्यादृष्टीने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संभाजी पाटील-निलंगेकर : (१) हे खरे नाही.

कोपरी (पूर्व) ठाणे येथे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (मुलींची) तसेच शासकीय तांत्रिक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय कार्यान्वित आहे. ठाणे (पूर्व) मध्ये असणाऱ्या या दोन्ही संस्था औद्योगिक व तंत्र प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आहेत.

तसेच सदर संस्थांपासुन ४ ते ५ किलोमीटर अंतरामध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ठाणे (वागळे) व मुलुंड या दोन संस्थांही कार्यरत आहेत.

(२) हे खरे नाही.

कोपरी (पूर्व) ठाणे येथील शासकीय तांत्रिक विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय ठाणे जिल्ह्यातील येथे इयत्ता ९ वी, १० वी मधील बाहेरील शाळेतील विद्यार्थी तंत्रशिक्षण घेण्यासाठी येतात. तसेच ११ वी व १२ वी (बायफोकल स्ट्रीम) चे बाहेरील कॉलेजचे विद्यार्थी आठवड्यातुन दोन दिवस तंत्रशिक्षण घेण्यासाठी येतात. संस्थेमध्ये पुर्ण वेळ उच्च माध्यमिक व्यावसायिक स्ट्रीमसाठी ११ वी व १२ वी चे विद्यार्थी शिक्षण घेतात.

संस्था सन १९५५ पासुन कार्यान्वित आहे. संस्था जुनी असल्याकारणाने सर्व सोयी सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेची पाच वर्षापुर्वी नवीन इमारत बांधण्यात आलेली आहे. वर्गखोल्या व सर्व विभाग सुस्थितीत आहेत तसेच प्रशिक्षणासाठी सर्व यंत्रसामुग्री व हत्यारे उपलब्ध आहेत. त्यामुळे विद्यार्थी तंत्रशिक्षणाचे प्रशिक्षण घेण्यापासुन वंचित राहण्याचा प्रश्न येत नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

शासकीय तांत्रिक विद्यालयाची नव्याने इमारत झालेली आहे. तथापि, नविन इमारतीमध्ये पुरेशी जागा नसल्याने मेकॅनिकल व इलेक्ट्रीकल विभागाच्या कार्यशाळा जुन्या इमारतीमध्येच आहेत. या जुन्या कार्यशाळा सन १९५८-५९ मध्ये बांधण्यात आल्या असुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन किरकोळ अत्यावश्यक दुरूस्त्या करून घेतलेल्या आहेत. सदर दोन्ही कार्यशाळा धोकादायक स्थितीत नाहीत. त्याचे संरचनात्मक परिरक्षण (Structural Audit) करून घेण्याबाबत संस्थेव्दारे सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.

तसेच कोपरी येथे कार्यरत असलेली औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ठाणे ही इमारत १९९८ मध्ये बांधुन ताब्यात घेतलेली असुन तिला जेमतेम २० वर्ष झालेली असल्यामुळे ती सुस्थितीत आहे व आवश्यकते प्रमाणे काही प्रमाणात दुरूस्ती व नुतनीकरण सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रस्तावित केलेले आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारच्या नविन इमारतीची आवश्यकता नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे येथील मुळा-मुठा नदी संवर्धनासाठी जायका प्रकल्पांतर्गत सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प उभारण्याबाबत

(५०) * ३८७७० श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.मोहनराव कदम, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३५२५० ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील मुळा-मुठा नदी संवर्धनासाठी जायका प्रकल्पांतर्गत सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प उभारण्यासाठीच्या भूसंपादनाचे काम संथगतीने सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पास केंद्र शासन पुरस्कृत योजनेंतर्गत मुळा मुठा नदीचे जलप्रदूषण कमी करण्यासाठी रुपये ९९० कोटी २६ लाख खर्चाची योजना मंजूर झालेली असून सन २०१७-१८ मध्ये केंद्र शासनाकडून सुमारे रुपये १०० कोटी अर्थसहाय्य प्राप्त होणे अपेक्षित असून योजनेसाठी लागणाऱ्या एकूण रुपये ९९० कोटी २६ लाख निधीचे नियोजन कशाप्रकारे करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार या प्रकल्पासाठी आवश्यक भूसंपादन करुन प्रकल्पाच्या कामास सुरुवात करुन पुर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३)

- पुणे महानगरपालिकेमार्फत जायका प्रकल्पांतर्गत वारजे, वडगांव (खु.) आणि मुंढवा येथील सांडपाणी शुध्दीकरण प्रकल्प उभारण्यात येत असून भूसंपादनासाठी आवश्यक रक्कम उपलब्ध नसणे व अन्य तांत्रिक, प्रशासकीय अडचणींमुळे भूसंपादनाच्या कार्यवाहीस विलंब झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे.
- सदर योजना रूपये ९९०.०० कोटी एवढ्या रकमेची असून प्रकल्प रकमेच्या ८५ टक्के रक्कम केंद्र शासनाकडून मिळणार असून पुणे महानगरपालिकेस १५ टक्के खर्च करावा लागणार आहे.
- खर्चाच्या एकूण रकमेच्या ८५ टक्के म्हणजेच रूपये ८४१.७२ कोटी अनुदानापैकी पहिला हप्ता रूपये ४.९९ कोटी व दुसरा हप्ता रूपये २१ कोटी प्राप्त झाला आहे.
- सदर प्रकल्पातील कामे १० पॅकेजमध्ये करण्याचे केंद्र शासनाने निश्चित केलेले आहे.
- प्रकल्पाचा कालावधी ६ वर्ष एवढा निश्चित केला आहे.
- या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून तज्ञ सल्लागारांची नेमणूक करण्यात आलेली असून प्रकल्प राबविण्याबाबतची पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जव्हार शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी खडखड तलावावरुन समांतर जलवाहिनी टाकणेबाबत

(५१) * ३८९७९ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) शहराची लोकसंख्या लक्षात घेऊन शहराला पाणीपुरवठा करण्यास नगरपालिकेस अडचणी येत असल्याने खडखड तलावावरुन उक्त शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी समांतर जलवाहिनी टाकण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खडखड तलावावरुन उक्त शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी समांतर जलवाहिनी टाकण्याच्यादृष्टीने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) जव्हार शहरास आवश्यक पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने खडखड धरण येथून जलवाहिनीद्वारे गुरुत्वीय दाबाने पाणीपुरवठा करण्याचे नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित आहे.

(३) उक्त पाणीपुरवठा योजनेचा रुपये १७.३८ कोटी (अंदाजे) रक्कमेचा प्रस्ताव जव्हार नगरपरिषदेने तांत्रिक मान्यतेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे सादर केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतीतून प्राप्त होणाऱ्या उपकराबाबत

(५२) * ३८२२७ श्री.प्रसाद लाड : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या १४,३७५ उपकर प्राप्त इमारतीतून जो उपकर मुंबई महानगरपालिका राज्य शासनाच्या सन १९७१ च्या तरतुदीनुसार गोळा करते तो अंशतः शासनास भरला जातो त्यामुळे

महानगरपालिकेकडून सुमारे रुपये ११९७ कोटींचे येणे बाकी असून त्यात महाराष्ट्र शासनाचा सहभाग धरून सुमारे रुपये २३९४ कोटींचा निधी म्हाडाला मिळणे अपेक्षित आहे. पण केवळ रुपये ८८ कोटींचा निधी दरसाल म्हाडाला प्राप्त होतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१३ मधील तत्कालीन शासनाने वार्षिक रुपये २०० कोटींचा निधी म्हाडाला वाटप करण्याचा निर्णय जाहीर केला होता त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) मुंबईतील जुन्या व मोडकळीस आलेल्या १४३७५ उपकरप्राप्त इमारतीतील उपकर वसुली महानगरपालिका मार्फत करण्यात येते. मनपाच्या दिनांक ३१/०३/२०१७ रोजीच्या अहवालानुसार उपकराची थकबाकी रुपये १२८७.७५ कोटी आहे. महानगरपालिकेने शासनाकडे जमा केलेल्या दुरुस्ती उपकराची रक्कम व शासन अंशदान असे एकुण रुपये ८८ कोटी निधी म्हाडास दरवर्षी प्राप्त होतो.

(२) व (३) उपकरप्राप्त इमारतीच्या दुरूस्तीसाठी म्हाडास २०० कोटी रूपये उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव म्हाडाकडून प्राप्त झाला असून त्यानुसार शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे. सदर २०० कोटी रूपये मंजूर होईपर्यंत उपकरप्राप्त इमारतीच्या दुरूस्तीसाठी म्हाडाने त्यांच्याकडील निधी वापरावा, असे म्हाडास कळविण्यात आले होते. त्यानुसार म्हाडा प्राधिकरणाच्या दिनांक १६/०२/२०१८ रोजीच्या बैठकीत उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्तीसाठी २०० कोटी रूपये निधी उपलब्ध करून देण्याबाबत मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाकडून प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पवई (मुंबई) येथील ड्रेनेजचे खोदकाम सुरु असताना क्रेनचा लोखंडी रहाट तुटून कामगारांचा मृत्यू झाल्याबाबत

(५३) * ३९१७५ श्री.मोहनराव कदम, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवई (मुंबई) येथील आयआयटीच्या प्रवेशद्वारासमोर ३० फूट खोल ड्रेनेजचे खोदकाम सुरु असताना येथे क्रेनचा लोखंडी रहाट तुटून झालेल्या अपघातात ३ कामगारांचा मृत्यू तर २ कामगार जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येथील कंत्राटदारांवर कारवाई करून मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) मुंबईतील पवई येथे आयआयटी गेटसमोरील मॅनहोलच्या कामाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त कंत्राटदाराची क्रेन कोसळून दिनांक ०१/०१/२०१८ रोजी झालेल्या दुर्घटनेत ४ कामगारांचा मृत्यू झाला असून १ कामगार जखमी झाला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) सदर घटनेची कामगार आयुक्त यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मे.मिशीगन इंजिनियर्स प्रा.लि. व मे.आर.पी.एस. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. या कंत्राटदारांविरुध्द पवई पोलीस ठाणे येथे दिनांक ३१/०१/२०१८ रोजी स्वतंत्र तक्रार दाखल करण्यात आली असून, खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे :-

- सदर कंत्राटदारांस प्राथमिक दंडात्मक कारवाई अंतर्गत दिनांक ०२/०१/२०१८ रोजी रुपये ४ लाख इतका दंड ठोठावण्यात आला आहे.
- सदर कंत्राटदारांस दिनांक ०३/०१/२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

दिनांक ०३/०१/२०१८ रोजी कामगार अधिकारी यांचेमार्फत दिलेल्या मनाई आदेशानुसार काम थांबविण्यात आले आहे.

सदर घटनेतील ४ मृत कामगाराच्या कुटुंबियांना प्रत्येकी रुपये ६०,०००/- इतकी तातडीची आर्थिक मदत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आली आहे.

तसेच, अंतरिम नुकसान भरपाईच्या दाव्याची पुर्तता करण्यासाठी आगाऊ रक्कम म्हणून प्रत्येकी रुपये ५०,०००/- चे धनादेश कंत्राटदारामार्फत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त यांच्याकडे जमा करण्यात आले आहेत.

नांदेड-वाघाळा महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांचे थकीत वेतन अदा करणेबाबत

(५४) * ३८५३१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड-वाघाळा महानगरपालिका कार्यालयासमोर मराठवाडा नगरपालिका व महानगरपालिका कर्मचारी युनियन तर्फे थकीत वेतन व प्रलंबित मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरु करण्यात आले असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांचे माहे मार्च-एप्रिल, २०१७ चे वेतन अदयाप अदा करण्यात आले नसून या कंत्राटी कामगारांनी सातत्याने याबाबत पाठपुरावा केल्यानंतर विद्यमान आयुक्त, नांदेड-वाघाळा महानगरपालिका व प्रशासनाकडून केवळ आश्वासने देण्यात येत असल्याने कर्मचाऱ्यांची आर्थिक कुचंबणा होत असल्याने याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) मराठवाडा नगरपालिका, महानगरपालिका कामगार कर्मचारी युनियन यांनी दिनांक ०३/०१/२०१८ रोजी उपोषणाबाबत नोटीस दिली होती. तथापि, त्यांनी आमरण उपोषण सुरु केलेले नाही.

(२)

- महानगरपालिका हद्दीअंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाचे काम मे.ए टू झेड इन्फ्रास्ट्रक्चर लि. या कंपनीस देण्यात आलेले होते.
- कामावर असलेल्या सर्व कंत्राटी कामगारांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची होती. संबंधित कंत्राटदारास महानगरपालिकेने देयक प्रदान करुनही कंत्राटी कामगारांना माहे डिसेंबर, २०१६ पासून कंत्राटदाराने वेतन दिलेले नाही.
- सदर कंपनीस दिलेले कंत्राट हे मार्च, २०१७ रोजी संपलेले आहे. त्यामुळे कंत्राटदारास महानगरपालिकेकडून देय असलेल्या रकमेमधून कंत्राटी कामगारांचे माहे डिसेंबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७ पर्यंतचे वेतन महानगरपालिकेमार्फत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या खात्यात थेट जमा करण्यात आलेले आहे.
- तसेच करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार कंत्राटी कामगारांना वेतन देणे बंधनकारक असताना ते न दिल्यामुळे कंत्राटदाराविरुध्द महानगरपालिकेने गुन्हा दाखल केलेला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील विविध शहरे नियमित हवाई सेवेद्वारे जोडण्याबाबत

(५५) * ३८९६७ श्री.आनंदराव पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३७०६० ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध शहरे नियमित हवाई सेवेद्वारे जोडण्याबाबत केंद्र शासनाच्या प्रस्तावित धोरणाशी सुसंगत धोरण आखण्याची कार्यवाही शासनाकडून पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोणकोणत्या शहरात हवाई सेवा सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्याच्या हवाई वाहतुकीबाबतचे शासनाने धोरण तयार केले आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) केंद्र शासनाच्या राष्ट्रीय विमानवाहतुक धोरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या Regional Connectivity Scheme (RCS-उडान) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी केंद्र शासन, राज्य शासन व भारतीय विमानपत्तन प्राधिकरण यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला असून या योजनेंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अ) अमरावती, ब) गोंदिया, क) नाशिक, ड) जळगाव, इ) नांदेड, फ) सोलापूर, ग) कोल्हापूर, ह) रत्नागिरी व ई) सिंधुदुर्ग ही विमानतळे RCS विमानतळे म्हणून अधिसूचित करण्यात आली आहेत. या अंतर्गत नांदेड-हैद्राबाद-नांदेड, नांदेड-मुंबई-नांदेड, जळगाव-मुंबई-जळगाव, नाशिक-मुंबई-नाशिक तसेच नाशिक-पुणे-नाशिक या विमानसेवा सुरु करण्यात आल्या आहेत.
(३) राज्याच्या हवाई वाहतुकीबाबतचे धोरण तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद महानगरपालिकेतील लाड समिती अंतर्गत केलेल्या कर्मचाऱ्यांच्या भरतीबाबत

(५६) * ३८५६७ श्री.सुभाष झांबड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद महानगरपालिकेत लाड समिती अंतर्गत केलेल्या १८ कर्मचाऱ्यांच्या भरतीत ३ उपायुक्त, ३ मुख्य लेखापरीक्षक, ४ आस्थापना अधिकारी व एक विधी सल्लागार अशा प्रकारे ११ जण दोषी असल्याचे

आढळून येवूनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर तात्काळ कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये माहे जानेवारी, २०१० ते नोव्हेंबर, २०१४ या कालावधीमध्ये लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार २१८ कर्मचाऱ्यांना वारसा हक्काने नियुक्त्या दिलेल्या आहेत.

या नियुक्त्यांमध्ये अनियमितता आढळून आल्यामुळे करण्यात आलेल्या चौकशीमध्ये ३ उपायुक्त, ३ मुख्य लेखापरिक्षक, ४ आस्थापना अधिकारी व एक विधी सल्लागार हे दोषी आढळून आल्यामुळे त्यांच्याविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील नियम ८ नुसार संयुक्त विभागीय चौकशी सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

सदर निर्णयानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर दोषारोप बजावण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

अकोला येथील पोलीस वसाहतीची दूरवस्था झाल्याबाबत

(५७) * ३८१९१ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील पोलीस वसाहतीची दूरवस्था झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांच्या वसाहतीमध्ये राहण्याकरिता देण्यात आलेली घरे अत्यंत अपुरे पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त वसाहतीच्या दुरुस्तीकरिता शासनाने निधीची तरतूद केलेली असून सुध्दा कोणत्याही प्रकारची निविदा प्रकिया सुरु करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पोलीस वसाहतीच्या दुरुस्ती / नुतनीकरणाकरिता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१), (२), (३) व (४) अकोला येथील पोलीस वसाहतीमधील निवासस्थाने दुरुस्तीच्या कामासाठी रुपये ५.०० कोटी इतक्या खर्चाच्या अंदाजास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर निधी वितरीत करण्यात आला आहे. या निधीमधून १५७ पोलीस निवासस्थानांच्या दुरुस्तीची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पूर्ण करण्यात आली आहेत.

निमवाडी, अकोला येथे ३७८ शासकीय निवासस्थानांच्या प्रकल्पाची निविदा महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाद्वारे प्रसिद्ध करण्यात आली आहे. या कामाकरिता रुपये ३१७५.३६ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखड्यात विसंगती असल्याबाबत

(५८) * ३८४८६ ॲड.अनिल परब : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मंजूर विकास आराखडयात विसंगती असल्याचे मान्य झालेले असल्याने सदर महानगरपालिका प्रशासनाने तात्काळ देण्यात येणाऱ्या बांधकाम परवानग्या व अनुषंगिक बाबी

शासनाचे मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत बंद करणेबाबत स्थानिक नागरिक श्री.कौस्तुभ दत्तात्रय गोखले यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव, प्रधान सचिव-१, नगरविकास विभाग, संचालक नगररचना, पुणे, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, सहायक संचालक नगररचना, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही शासनस्तरावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) अशा स्वरुपाचे निवेदन शासनास प्राप्त झाले असून, सदर प्रकरणी तपासणी करुन शासनास अभिप्राय सादर करणेबाबत संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दिनांक २०/१/२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर प्राप्त निवेदनामध्ये नमूद मुददयांची तपासणी करुन उचित निर्णय घेण्याची शासनाची भूमिका आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

मुंबईतील आरे दुग्ध वसाहतीतील वृक्ष नष्ट करण्यात येत असल्याबाबत

(५९) * ३७७४१ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील आरे दुग्ध वसाहतीतील वृक्षसंपदा नष्ट व्हावी म्हणून वृक्षांच्या मुळाशी ॲसिडसदृश्य विषारी औषध घालून वृक्ष नष्ट करण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी आरे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवूनही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार याप्रकरणातील किती गुन्हेगारांना अटक करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) हे खरे नाही.

तथापि, फिर्यादीकडून प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने वनराई पोलीस ठाणे येथे एका आरोपीविरुध्द अदखलपात्र नोंद क्र. ४४/१८ कलम ८ सह २१, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(३) होय.

सदर प्रकरणात एक आरोपी असुन आरोपी इसमाचा जिवंत झाड मारण्याचा उद्देश निदर्शनास आले आहे. व त्याने सदरचे कृत्य मान्य केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

लालबाग (मुंबई) येथील उड्डाणपुलाची दुरुस्ती करण्याबाबत

(६०) * ३७८०५ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३४७९४ ला दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लालबाग (मुंबई) येथील उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाल्यानंतर पुलाला तडे गेल्याने मा.मुंबई उच्च न्यायालयाने उड्डाणपुलाचे काम माहे फेब्रुवारी, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश दिल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुरुस्तीपूर्वी सदर पुलाचे “स्ट्रक्चरल ऑडीट” देखील करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धोकादायक उड्डाणपुलामुळे जिवित हानी होण्याची शक्यता असल्याने शासनाने पुल दुरुस्तीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) लालबाग येथील उड्डाणपुलाच्या दुरुस्तीचे काम दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक १३ सप्टेंबर, २०१७ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिले आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

सदर उड्डाणपुलाच्या संरचनात्मक परिक्षणासाठी (स्ट्रक्चरला ऑडिट) नियुक्त करण्यात आलेल्या सल्लागाराने संरचनात्मक परिक्षण अहवाल दिनांक ०८ फेब्रुवारी, २०१७ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केला आहे.

(३) व (४) सदर उड्डाणपुलाच्या दुरुस्तीबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे :-

- रेट्रोफिटींग स्कीम व अंदाजपत्रक तयार करण्याच्या कामासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.
- रेट्रोफिटींग स्कीम प्राप्त झाल्यानंतर आय.आय.टी. मुंबई यांचेमार्फत त्याची तपासणी करण्यात येऊन निविदा प्रक्रिया सुरु करण्यात येणार आहे. सदर दुरुस्तीचे काम दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

मरोळ (मुंबई) येथील सेव्हन हिल रुग्णालयातील डॉक्टर संपावर गेल्याबाबत

(६१) * ३८६४८ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मरोळ (मुंबई) येथील सेव्हन हिल या रुग्णालयातील ५० डॉक्टरांना मागील सहा महिन्यांपासून वेतन मिळाले नसल्यामुळे संपावर गेले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांनी केलेल्या संपामुळे दोन आठवड्यांपासून रुग्णालयाच्या कामकाजावर परिणाम होऊन बाह्यरुग्ण विभागही बंद पडला असून रुग्णाना त्याचा नाहक त्रास होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी रुग्णालय प्रशासन व डॉक्टरांसमवेत शासनाने मध्यस्थी करुन योग्य तोडगा काढून संपावरील डॉक्टरांना कामावर रुजू होण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) सेव्हन हिल्स रुग्णालयातील डॉक्टर्स माहे जानेवारी, २०१८ मध्ये संपावर गेले होते ही वस्तुस्थिती आहे.

(२) हे खरे नाही.

मरोळ येथील सेव्हन हिल रुग्णालयातील डॉक्टरांनी केलेल्या संपामुळे बाह्यरुग्ण विभाग बंद पडला नसून, तो अद्यापी कार्यरत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(३) व (४) बृहन्मुंबई महानगरपालिका आणि सेव्हन हिल्स हेल्थ केअर प्रा.लि. यांचेमध्ये करण्यात आलेल्या करारातील कलम २७(एफ) अन्वये सेव्हन हिल्स रुग्णालयाचे प्रचलनासाठी आवश्यक तो कर्मचारीवृंद नेमणे व त्यांचेशी संबंधित इतर सर्व बाबींची जबाबदारी ही सेव्हन हिल्स हेल्थ केअर प्रा.लि. यांची आहे.

सदर रुग्णालयातील संपकरी डॉक्टर्स व रुग्णालय प्रशासन यांचेतील वाद न्यायप्रविष्ठ आहे.

पंढरपूर बसस्थानक ते नगरपालिका या रस्त्यावरील वाहतुक कोंडीबाबत

(६२) * ३८२६९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर बसस्थानक ते नगरपालिका या रस्त्यावर अतिक्रमण झाल्यामुळे वाहतुक कोंडी होत असून याकडे संबंधित वाहतुक शाखा दुर्लक्ष करीत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वाहतुक कोंडीमुळे बसस्थानकांवरुन येणाऱ्या भाविकांची गैरसोय होत असल्याने रस्त्यावर दुकानदारांनी केलेली अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत तसेच बेशिस्त वाहन चालकांवर संबंधित विभाग दुर्लक्ष करत असल्याप्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) पंढरपूर बस स्थानक ते नगरपालिका या रस्त्यावर अतिक्रमण झाले असल्याने या ठिकाणी मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे ही बाब खरी आहे. मात्र याकडे संबंधित वाहतुक शाखा दुर्लक्ष करीत असल्याची बाब खरी नाही.

(२) पंढरपूर हे तीर्थक्षेत्र असल्याने या ठिकाणी मोठया प्रमाणात लोक त्यांच्या वाहनांसह येतात. सध्या पंढरपूर शहरामध्ये एकूण ८ विविध मुख्य रस्त्यांची दुरुस्तीची कामे चालू असल्याने तसेच काही ठिकाणी रस्त्यावरील अतिक्रमणामुळे वाहतुकीस कमी रस्ते उपलब्ध होतात. परंतु शहर पोलीस ठाणे हद्दीत जनसामान्यांची गैरसोय होऊ न देता वाहतुक नियमावलीच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे.

पंढरपूर बस स्थानक ते नगरपालिका हा मार्ग अरुंद असून या मार्गाच्या दोन्ही बाजूस मोठमोठी रुग्णालये, नागरी वस्ती, बाजारपेठ असल्याने नागरीकांची तसेच स्थानिक व्यापाऱ्यांची त्यांच्या वाहनांसह नेहमीच वर्दळ असते. व्यापारी लोकांना मालवाहतूकीची वाहने ही जास्त रहदारीचे

वेळेस या मार्गावर न आणण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच सदर रस्त्यावरील अतिक्रमण योग्य तो पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देऊन नगरपालिकेच्या मदतीने काढण्यात आलेले आहे. बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्याकरीता नगरपरिषदेमार्फत वाहतुक पोलिसांना व्हेईकल जामर्स उपलब्ध करुन दिलेले आहेत.

पंढरपूर शहर पोलीस ठाण्यामार्फत अवैध प्रवासी वाहतुक करणारी वाहने व वाहतुक नियमांचे उल्लंघन कारणारे यांचे विरुध्द केलेली कारवाई पुढीलप्रमाणे आहे :-

सन २०१६		सन २०१७	
केसेस	दंड	केसेस	दंड
१०,५५६	४,९८,०००	१४,३३३	३९,५०,३००

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील अग्नि प्रतिबंधक यंत्रणा नसलेल्या इमारतींवर कारवाई करण्याबाबत

(६३) * ३७९९५ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.मितेश भांगडिया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील इमारतींमधील आग नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यक यंत्रणा नसलेल्या २३०० धोकादायक इमारतींवर दोन महिन्यांमध्ये कारवाई करण्याचे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शहरातील नामवंत हॉटेल्स, मंगल कार्यालये यांनी अग्निशमन विभागाचे प्रमाणपत्र घेतलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या आदेशानुसार उक्त महानगरपालिकेने कोणतीही कारवाई केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार नागपूर शहरातील आग प्रतिबंधक यंत्रणा नसलेल्या इमारतींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०६/०९/२०१७ रोजी खालीलप्रमाणे आदेश पारित केलेले आहेत. :-

अ) अग्निसुरक्षा नियमाचे पालन करीत नसलेल्या इमारतीवर महाराष्ट्र अग्निसुरक्षा व जीव संरक्षक अधिनियम, २००६ नुसार कार्यवाही करावी.

ब) यापैकी काही इमारती, भोगवटा प्रमाणपत्राशिवाय वापरात असण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा इमारतीवर महाराष्ट्र अग्नि सुरक्षा व जीव संरक्षक अधिनियम, २००६ मधील कलम ६ व ८ व्यतिरिक्त, महाराष्ट्र नगररचना अधिनियमातील तरतुदीनुसार प्रतिबंधात्मक आणि उपाययोजनात्मक कारवाई महानगरपालिका करु शकते.

(२) शहरामध्ये नामवंत ४७ मंगलकार्यालये आणि ५३ हॉटेल्स असून, त्यांनी अग्निशमन विभागाकडून प्रथम ना-हरकत घेतले असून, यापैकी १० मंगल कार्यालयांनी व १० हॉटेल धारकांनी अंतिम ना-हरकत घेतली आहेत.

उर्वरित ३७ मंगलकार्यालये आणि ४३ हॉटेल धारकांबाबत अंतिम ना-हरकत प्रमाणपत्राच्या अनुषंगाने, अधिनियमाच्या तरतुदीनुसार महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून याबाबत वेळोवेळी कार्यवाही केली जात असून, ही एक निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.

त्यानुसार १४९० इमारतींची तपासणी पूर्ण झालेली असून, यापैकी ६३४ इमारतींनी अग्निशमन उपाययोजनांबाबत अंतिम ना-हरकत प्रमाणपत्र घेतले आहे.

८५६ इमारतींना अधिनियमातील तरतुदीनुसार उपायोजना करण्यासंबंधात टप्प्याटप्प्याने नोटीस दिल्यानंतर, ५७८ इमारतींनी विहीत कालावधीत उपाययोजना पूर्ण न केल्यामुळे, अशा इमारतींचे वीज व पाणी कनेक्शन तोडण्याबाबत संबंधित विभागांना निर्देशीत करण्यात आलेले आहे. तर उर्वरित २७८ इमारतींचा विहीत कालावधी अद्याप बाकी आहे.

याशिवाय ८१० इमारतींची तपासणी अग्निशमन विभागातील अधिकारी/ कर्मचारी यांचे मार्फत सुरु आहे.

पुणे महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना मुलभूत सामुग्री पुरविण्याबाबत

(६४) * ३८७७९ श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना सफाई काम करीत असताना आरोग्याच्या व सुरक्षिततेच्यादृष्टीने पुरविले जाणारे हातमोजे, मास्क, गणवेश, चष्मा यासारख्या मुलभूत सामुग्री संदर्भात श्री.बी. व्ही. लाड समितीने सन १९७४ मध्ये सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनूसार पुरविल्या जात नसल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुलभूत सामुग्रीचा दर्जा व गुणवत्ताही अत्यंत निकृष्ठ दर्जाची असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुरविली जाणारी सामुग्री ही उत्कृष्ट दर्जाची पुरविण्यासंदर्भात व इतर मागण्यांबाबत कामगार संघटनांनी महानगरपालिका प्रशासनाकडे यापूर्वी वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या इतर मागण्या काय आहेत व त्या मान्य करण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) व (२) सफाई कामगारांना आरोग्य व सुरक्षितेच्या दृष्टिने पुरविली जाणारी सामुग्री लाड समितीच्या शिफारशीनुसार पुरविण्याची दक्षता पुणे महानगरपालिकेकडून घेण्यात येते. सफाई कर्मचाऱ्यांना त्यानुसार खालील सुविधा पुरविण्यात येतात :-

- पुरुष व महिला सेवकांना अनुक्रमे गणवेश व साडया पुरविल्या जातात.
- शिलाई भत्ता, खराटा भत्ता, धुलाई भत्ता, इ. भत्ते नियमित पुरविले जातात.
- साबण, रेणकोट, इ. सामग्री पुरविली जाते.
- आवश्यकतेनुसार गमबुट, सेफ्टी गॉगल्स, हॅण्डग्लोव्हज, फावडे, मास्क इ. सुरक्षा प्रावरणे व सुविधा पुरविल्या जातात.

कर्मचाऱ्यांना साधन सामुग्री पुरविण्यापुर्वी सदर वस्तुंची नमुना तपासणी झाल्यानंतर त्यांची खरेदी केली जाते. नमुना व खरेदी करण्यात आलेल्या वस्तु या दोन्ही मध्ये तफावत आढळून आल्यास अशा वस्तु खरेदी केल्या जात नाहीत.

(३) व (४) अखिल भारतीय सफाई कर्मचारी संघटनेकडून सफाई कामगारांच्या समस्यांबाबत वेळोवेळी मागणी करण्यात येत असते.

सफाई कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण मागण्या खालील प्रमाणे आहेत :-

- सफाई कर्मचाऱ्यांची भरती व पदोन्नती
- सफाई कर्मचाऱ्यांना निवासस्थानाची व्यवस्था
- सफाई कर्मचाऱ्यांना शैक्षणिक कर्ज व शिष्यवृत्ती व इतर अनुदाने
- सफाई सेवकांच्या वारसांना नोकरी.

सफाई कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत प्राधान्याने विचार करण्यात येत असून खालील कार्यवाही करण्यात आलेली आहे :- पुणे महानगरपालिकेमधील जे सफाई कर्मचारी अर्हता प्राप्त होतात अशा कर्मचाऱ्यांना वर्ग-४ मधून वर्ग-३ च्या संवर्गामध्ये पदोन्नत्या देण्यात आलेल्या आहेत.

- ज्या सफाई कर्मचाऱ्यांची सेवा २५ वर्षे झालेली आहे व जे सेवानिवृत्त झालेले आहेत अशा कर्मचाऱ्यांना घरे वाटप करण्याची कार्यवाही सुरू आहे.
- सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना लाड-पागे समितीच्या शिफारशींनुसार पुणे महानगरपालिकेत नोकरी देण्यात येते.

- ज्या सफाई कर्मचाऱ्यांची मुले १० वी व १२ वी च्या परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत आलेले आहेत त्यांना शैक्षणिक अर्थसहाय्य देण्यात येते.
- सफाई कर्मचाऱ्यांसाठी अपघात विमा योजना सुरु करण्यात आली आहे.
- सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्याविषयी सल्लागारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

तलासरी (जि.पालघर) नगरपरिषदेस अग्निशामक वाहन उपलब्ध करून देण्याबाबत

(६५) * ३८९८३ श्री.रविंद्र फाटक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) नगरपरिषदेकडे आग लागण्याची घटना घडल्यास अग्निशामक वाहन उपलब्ध नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयात मोठया प्रमाणात एमआयडीसी क्षेत्र असल्याने कोणत्याही क्षणी आग लागण्याची घटना घडू शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयाची लोकसंख्या व एमआयडीसीचे क्षेत्र विचारात घेऊन शासनाने नगरपरिषदेला अग्निशामक वाहन उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) तलासरी नगरपंचायत सन ०७/०५/२०१६ मध्ये नव्याने स्थापन झाली असून, नगरपंचायतीकडे अग्निशमन वाहन नाही ही वस्तूस्थिती आहे.

(२) तलासरी नगरपंचायतीच्या हद्दीत रहिवासी व वाणिज्य वापर क्षेत्र असल्याने अग्निशमनाबाबतच्या आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. एम.आय.डी.सी. क्षेत्रात अग्निशमनाबाबत संबंधित विभागाकडून आवश्यक त्या उपाययोजना करणे अभिप्रेत असून त्यानुसार दक्षता घेण्यात येत आहेत. तलासरी ही नव्याने नगरपंचायत स्थापन झाली असून, नगरपंचायतीची स्वत:ची अग्निशमन यंत्रणा उभी होईपर्यंत नगरपंचायत क्षेत्रात एम.आय.डी.सी.ने अग्निशमनाबाबत आवश्यक त्या उपाययोजना करणे अभिप्रेत आहे.

(३) नगरपंचायतीला अग्निशामक वाहन उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील म्हाडाच्या मास्टर लिस्टमधील घरांचे परस्पर वितरण करण्यात आल्याबाबत

(६६) * ३८२४३ श्री.प्रसाद लाड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या इमारत दुरुस्ती मंडळाच्या माध्यमातून मास्टर लिस्टमधील देण्यात येणाऱ्या शिवाजी पार्क येथील कोटयवधी रुपयांच्या घरांचे परस्पर वितरण करण्यात आले असल्याचा आरोप ट्रांन्झिट कॅम्प असोशिएशनने केल्याचे दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, म्हाडाच्या नियम ३५ मधील तरतुदीनुसार मास्टर लिस्टमधील घरे मूळ रहिवाशांशिवाय कोणालाही वितरीत करता येत नाहीत तरीही मुंबई इमारत आणि पुनर्रचना मंडळाने मास्टर लिस्टमधील सुमारे १५९ घरे मुंबई मंडळाला लॉटरीसाठी देण्याची योजना आखली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे ही घरे लॉटरीसाठी देता येत नाहीत त्यासाठी नियमात बदल करावा लागतो तसेच घरे देण्यासाठी म्हाडाच्या कायद्यात बदल करावा लागतो पण कायद्यात असा कोणताही बदल करण्यात आलेला नसल्यामुळे कायद्याचे उल्लंघन झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार सदर प्रक्रियेत गैरप्रकार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.प्रकाश महेता : (१) हे खरे नाही.

तथापि, श्री.प्रकाश गडकर यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. २९७०/२०१६ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २९/०३/२०१७ रोजी दिलेल्या न्याय निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी पुनर्विकसित इमारत "बिल्डआर्च ओलिव्ह", शिवाजी पार्क, दादर येथील इमारत गाळा क्र. १०३ (क्षेत्रफळ ३०९ चौ.फु.) चे वितरण, त्यांच्या मूळ गाळ्याच्या हक्कापोटी करण्यात आलेले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

तथापि, म्हाडाच्या अख्यत्यारितील ४०० ते ७५३ चौ.फूट क्षेत्रफळाचे गाळे मागणी अभावी रिक्त असल्याने त्याचे वितरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर गाळ्यांचा देखभालीचा खर्च तसेच मालमत्ता कर इ. खर्च हा मंडळास करावा लागतो. अशा प्रकारचे आर्थिक नुकसान टाळण्याच्या हेतूने प्राधिकरणाने ठराव क्र.६७४३ दिनांक ११/०७/२०१७ अन्वये १५३ गाळे मुंबई मंडळाकडे वर्ग करण्यात आलेले आहेत. त्यापैकी सन २०१७ तील सोडतीमध्ये ३६ गाळ्यांचे (एकूण १२३७.६२ चौ.मी. क्षेत्रफळाच्या) वितरण करण्यात आले असून सदर क्षेत्रफळापोटी मुंबई मंडळाने ३०० ते ३५० चौ.फूट क्षेत्रफळ असलेले गाळे मुंबई इमारत व दुरुस्ती मंडळास बृहतसूचीद्वारे वितरणासाठी उपलब्ध करुन देण्याबाबत. क्र.६७४३, दिनांक ११/०७/२०१७ अन्वये प्राधिकरणाने धोरण निश्चित केले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

माचनूर (जि.नांदेड) शिवारातील अवैधरित्या वाळू वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई करणेबाबत

(६७) * ३८५४० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील माचनूर शिवारात दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास अवैधरित्या वाळू वाहतुक करणारे दोन ट्रॅक्टर पकडून चालकांविरुध्द कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी आढळून आलेल्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी अवैध वाळूची वाहतुक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकाविरुध्द कुंडलवाडी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.०१/२०१८ भा.दं.वि. कलम ३७९ सह महाराष्ट्र गौण खनिज अधिनियम कलम २१(१) व गु.र.नं. ०२/२०१८ भा.दं.वि. कलम ३७९ सह महाराष्ट्र गौण खनिज अधिनियम कलम २१(१) अन्वये दिनांक ०१/०१/२०१८ रोजी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

सदर दोन्ही गुन्हयातील आरोपींना अटक करुन मा.न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने सदर दोन्ही आरोपींना मॅजिस्ट्रेट कस्टडी रिमांडमध्ये पाठविण्यात आले आले असून सदरील गुन्हयांचा तपास चालू आहे.

(३) विलंब झालेला नाही.

राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायतीच्या आराखडयांची पुनर्प्रसिध्दी करण्याबाबत

(६८) * ३८२१७ श्री.गोपिकिशन बाजोरीया : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २७ महानगरपालिका, २३६ नगरपालिका व १२५ नगरपंचायतीच्या बहुतांश विकास आराखडयांची पुनर्प्रसिध्दी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास आराखडयांची पुनर्प्रसिध्दी झाली नसल्यामुळे राज्यातील महानगरपालिका व नगरपालिका यांचा विकास प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास आराखडे तयार करताना स्थानिक नगरसेवकांना विश्वासात घेण्यात येत नसून अनेक नगरपालिका व महानगरपालिकांच्या हद्दवाढीचे प्रस्ताव ही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे तरतुदी नुसार विकास योजना मंजूर होवून ज्या दिनांकास अंमलात आली असेल त्या दिनांकापासून २० वर्षात निदान एकदा नियोजन प्राधिकरणास आवश्यक असल्यास अथवा शासनाच्या निदेशानुसार त्यांच्या कार्यक्षेत्रातील क्षेत्राचे नव्याने सर्वेक्षण केल्यानंतर व विदयमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर विकास योजनेची फेर तपासणी नियोजन प्राधिकरण करु शकते.

राज्यात २७ मनपा, २३६ नगरपालिका व १२५ नगरपंचायती आहेत. यापैकी १६ नगरपालिका व १२० नगरपंचायती नव्याने सन २०१३-२०१६ या काळात स्थापन झालेल्या आहेत त्यामुळे त्यांच्या विकास योजना अद्याप तयार व्हावयाच्या आहेत. मंजूर विकास योजनांपैकी ०५ महानगरपालिका, ८२ नगरपालिका व ३ नगरपंचायती अशा एकूण ९० विकास योजना मंजूर

होवून २० वर्षांचा कालावधी झालेला आहे. या विकास योजना मंजूर झाल्यानंतर २० वर्षाच्या आत सुधारित करण्याची जबाबदारी संबंधित नियोजन प्राधिकरणाची आहे. याबाबत नगरविकास विभागाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(२) नाही.

सुधारित विकास योजना प्रसिध्द होवून मंजूर होईपर्यंत मंजूर असलेली विदयमान विकास योजना अंमलात असते त्यामुळे विकास योजना सुधारित न केल्यामुळे विकास प्रलंबित आहे असे म्हणता येणार नाही.

(३) व (४) विकास आराखडे तयार करण्यात आल्यानंतर उक्त अधिनियमातील कलम-२६ च्या तरतूदीनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने प्रसिध्द करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येते.

तसेच शासनस्तरावर १८ नगरपालिका/महानगरपालिकांचे हद्दवाढीचे प्रस्ताव कार्यवाहीमध्ये आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.